रायगड, नवी मुंबई
# राम प्रहर
◆ वर्ष १७ ◆ अंक ३१३
www.ramprahar.com
शनिवार, ३१ मे २०२५ ◆ पाने ८ किंमत ₹२

अंतरंग

आठवडाभरातील पावसाचा उन्हाळी भातशेतीला फटका/२
'लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला द्यावे'/६
थाई बॉक्सिंगमध्ये कर्जतच्या वैदेही जाधवला रौप्यपदक/८

## मोसमी वाऱ्यांची वाटचाल खोळंबली; उकाड्यात वाढ



**मुंबई :** मागील दोन दिवसांपासून मोसमी वारे एकाच जागेवर रेंगाळले आहेत. त्यामुळे पुढील काही दिवस संपूर्ण राज्यात पावसाचा जोर कमी राहणार आहे. काही भागात हलक्या ते मध्यम सरी बरसतील, मात्र मुसळधार पावसाची शक्यता नसल्याचे हवामान विभागाने म्हटले आहे. कोकण, मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातही पावसाचा जोर ओसरला आहे. पावसाने विश्रांती घेतल्यामुळे उकाड्यात वाढ झाली आहे. मागील काही दिवस पावसाच्या सरींमुळे दिलासा मिळाला होता, मात्र आता पुन्हा उकाडा सहन करावा लागत आहे. हवामान विभागाने वर्तवलेल्या अंदाजनुसार जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात मोसमी पावसाच्या प्रगतीसाठी पोषक स्थिती नाही. पावसाचे प्रमाण कमी राहील, मात्र १२ जूननंतर संपूर्ण राज्यात पाऊस सक्रिय होईल. जून महिन्याच्या दुसऱ्या आठवड्यात चांगल्या पावसाची अपेक्षा आहे.

# अहिल्यादेवींकडून संस्कृतीचे पुनरुज्जीवन

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांकडून कार्याचे स्मरण

**पुणे : प्रतिनिधी**

औरंगजेबने उद्ध्वस्त केलेली मंदिरे, घाट यांचे पुनर्निर्माण करून पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांनी हिंदू संस्कृतीचे पुनरूज्जीवन केले, अशा शब्दांत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी शुक्रवारी (दि. ३०) अहिल्यादेवी यांच्या कार्याचे स्मरण केले.

भारतीय युवा मोर्चा वतीने पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मोत्सव सोहळ्यानिमित्त आयोजित युवा प्रेरणा संवाद कार्यक्रमात मुख्यमंत्री बोलत होते. कार्यक्रमास उच्च व तंत्र शिक्षणमंत्री चंद्रकांत पाटील, आमदार सर्वश्री हेमंत रासने, शंकर जगताप, योगेश टिळेकर, विक्रांत पाटील, युवा मोर्चा प्रदेश अध्यक्ष अनुप मोरे आदी उपस्थित होते.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, दुर्दैवाने आपल्याला खरा इतिहास शिकवला गेला नाही. मुघलांचे राज्य जाऊन इंग्रजाचे राजवट आली हे खरे नाही. या दरम्यानच्या काळात छत्रपती शिवाजी महाराजांनी स्थापन केलेले हिंदवी स्वराज्य विविध प्रांतात चालवले जात होते. माळवा प्रांतात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर



यांनी २८ वर्ष राज्य कारभार पाहत तळागाळातील लोकांचा उत्कर्ष साधला. परकीय आक्रमकांनी भारतीय संस्कृतीची पाळेमुळे फोडून काढण्याचा प्रयत्न केला. अहिल्यादेवींनी हिंदू धर्माची प्रतीके असलेले घाट, ज्योतिर्लिंग, शक्तीस्थळांचे, भारतीय संस्कृतीचे पुनरूज्जीवन केले.

अहिल्यादेवींचे कार्य पुढे नेण्याचे काम आपल्याला करायचे आहे. त्यासाठी राज्य सरकारने त्यांचे जन्मगाव चौंडी येथे मंत्रिमंडळाची बैठक घेऊन ज्योतिर्लिंग विकासाचा बृहत आराखडा तयार केला तसेच महिलांच्या विकासाची मुहूर्तवेध रोवली. त्यातून राज्यात सक्षम अहिल्यादेवी घडवून महाराष्ट्र प्रगतिपथावर नेण्याचे कार्य करण्याचा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

# कला जोपासा, किर्तीवंत व्हाल!

### लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे प्रतिपादन | अभिनय प्रशिक्षण शिबिराचा समारोप




**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नृत्य, गायन, अभिनय अशा विविध कलांपैकी कोणतीही कला जर जोपासली, तर तुम्ही नक्की किर्तीवंत व्हाल तसेच कलेमध्ये यश मिळवायचे असेल तर त्या दृष्टीने प्रशिक्षण घेणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुक्रवारी (दि. ३०) केले.

पनवेल महानगरपालिका आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा पनवेल यांच्या संयुक्त विद्यमाने आठ दिवसांचे अभिनय प्रशिक्षण शिबिर आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात घेण्यात आले होते. या शिबिराच्या समारोप समारंभात लोकनेते रामशेठ ठाकूर बोलत होते. या वेळी त्यांनी सर्व रंगकर्मी, प्रशिक्षणार्थींना पुढील कारकीर्दीसाठी शुभेच्छा देऊन कला क्षेत्र जोपासण्यासाठी ठाकूर परिवार पनवेलकरांच्या सदैव सोबत राहील, अशी ग्वाही दिली.

या कार्यक्रमास अखिल भारतीय नाट्य परिषद पनवेल शाखेचे अध्यक्ष आमदार प्रशांत ठाकूर, बाल रंगभूमी परिषदेच्या उपाध्यक्ष तथा नाट्य परिषदेच्या कार्यकारिणी सदस्य प्राचार्य डॉ. दीपा क्षीरसागर, नाट्य परिषद पनवेल शाखा उपाध्यक्ष तथा महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, अभिनेते प्रकाश राणे, मनपा उपायुक्त प्रसेनजित कारलेकर, मंगला माळवे, सचिव अक्षय कदम, प्रशिक्षक अशोक केंद्रे (मुंबई), रवि धुताडमल (बीड), मनोज चिताडे (वर्धा) आदी मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार प्रशांत ठाकूर यांनी मार्गदर्शन करताना पनवेल कार्यक्षेत्रात उत्तमोत्तम कलाकार बनावेत अशा शुभेच्छा देऊन यासाठी महापालिका व पनवेल नाट्य परिषद शाखेने अभिनय शिबिर घेतल्याबद्दल अभिनंदन केले. भविष्यात नक्कीच या अभिनय शिबिराचा सर्व प्रशिक्षणार्थींना प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष भरपूर फायदा होईल, असे सांगून या निमित्ताने महापालिका सांस्कृतिक चळवळ उभी करून नवीन पायंडा पाडत असल्याचेही त्यांनी सांगितले.

डॉ. दीपा क्षीरसागर यांनी सांगितले की, हल्ली सर्वजण ताण-ताणवाचे जीवन जगत आहे. शरीराचा ताण कमी करण्यासाठी व्यायाम केला जातो, पण मनावरचा ताण कमी करण्यासाठी कलाच उपयोगी पडते. यासाठी मुलांना गायन, नृत्य, अभिनय अशा विविध कलांचे प्रशिक्षण देणे आवश्यक आहे. पनवेल मनपा व नाट्य परिषद असे उपक्रम घेत घेत असल्याबद्दल त्यांनी विशेष कौतुक केले. **(पान २ वर..)**

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आजपासून पनवेलमध्ये भव्य कीर्तन महोत्सव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

सामाजिक, शैक्षणिक, राजकीय, आध्यात्मिक, सांस्कृतिक क्षेत्रात अग्रगण्य आणि दानशूर व्यक्तिमत्व माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा २ जून रोजी ७४वा वाढदिवस असून ते अमृत महोत्सवी वर्षात पदार्पण करीत आहेत. त्या अनुषंगाने वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रम आयोजित करण्यात आले असून त्याचा शुभारंभ संतवाणीच्या गोडव्याने अर्थात कीर्तन महोत्सवातून होणार आहे. ३१ मे ते २ जूनपर्यंत खांदा कॉलनीमधील सीकेटी महाविद्यालयाच्या मैदानावर लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्या वतीने तीन दिवस भव्य स्वरूपात हा महोत्सव होणार आहे.

लोकनेते रामशेठ ठाकूर दानशूर व्यक्तिमत्व म्हणून केवळ महाराष्ट्रातच नव्हे; तर पूर्ण देशात ओळखले जातात. त्यांचे सर्व क्षेत्रातील योगदान नेहमीच आदर्शवत राहिले आहे. त्यांनी सामाजिक बांधिलकी कायम जपली. सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक, क्रीडा क्षेत्राला प्रोत्साहन व अर्थसहाय्य केले. त्याचबरोबर आध्यात्मिक क्षेत्रातही त्यांचे कार्य मोलाचे आहे. मंदिरे बांधणे, मंदिराचे जीर्णोद्धार तसेच दिंडीसाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सढळ हस्ते मदत केली आहे. त्यामुळे त्यांच्या वाढदिवसानिमित्त हा आध्यात्मिक सोहळा मोठ्या प्रमाणात उत्सव म्हणून साजरा झाला पाहिजे यासाठी वारकरी संप्रदायातील व्यक्तींनी पुढाकार घेतला आहे.

दानशूरता, समाजसेवा आणि अष्टपैलू कर्तृत्व यांचा अद्वितीय संगम असलेला लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अमृत महोत्सवी वाढदिवस वर्ष संपूर्ण वर्षभर विविध समाजोपयोगी कार्यक्रमाने साजरा करण्याचा निर्णय समितीने घेतला आहे. अमृत महोत्सवी वर्षाच्या पदार्पणानिमित्त अध्यात्मिक, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक, कला अशा क्षेत्रातील विविध उपक्रम राबविण्यात येणार असून कीर्तन महोत्सव हा पहिला आध्यात्मिक कार्यक्रम असणार आहे. यामध्ये संगीत भजन, हरिपाठ, हरी कीर्तन आणि आध्यात्मिक क्षेत्रातील ज्येष्ठांचा सन्मान करण्यात येणार आहे. तीन दिवस कीर्तन साथकरी म्हणून पनवेल, उरण, खालापूर परिसरातील समस्त वारकरी संप्रदायातील गुणीजन मंडळांची साथ लाभणार आहे. **(पान २ वर..)**

## फरार निलेश चव्हाणला बेड्या


**पुणे : प्रतिनिधी**



वैष्णवी हगवणे आत्महत्येप्रकरणी निलेश चव्हाणला नेपाळमधून बेड्या ठोकल्या आहेत. गेल्या काही दिवसांपासून तो फरार होता. अखेर पिंपरी-चिंचवड पोलिसांनी त्याला नेपाळ बॉर्डरवरून अटक केली. निलेश हा वैष्णवीच्या नणंदेचा विकृत मित्र आहे.

वैष्णवीचा छळ करून तिला आत्महत्येला प्रवृत्त केल्याप्रकरणी सासरे राजेंद्र हगवणे, पती शशांक हगवणे, दीर सुशील हगवणे, सासू लता हगवणे, नणंद करिष्मा हगवणे यांना यापूर्वीच अटक करण्यात आली असून ते सर्व पोलीस कोठडीत आहेत, तर आरोपी निलेश चव्हाण हा फरार होता. मागील काही दिवसांपासून पोलीस त्याच्या मागावर होते.


वैष्णवी हगवणे यांचे बाळ दोन दिवस निलेशकडे होते. हे बाळ घेण्यासाठी वैष्णवीचे नातेवाईक गेले असता निलेशने त्यांना बंदुक दाखवून धमकावले. तशी तक्रार करण्यात आलेली आहे. यानंतर चव्हाण फरार झाला होता.



# आठवडाभरातील पावसाचा उन्हाळी भातशेतीला फटका

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात मागील आठवडाभरापासून सुरू असलेल्या मुसळधार पावसात आंबा, उन्हाळी भात आणि भाजीपाल्याचे मोठया प्रमाणावर नुकसान झाले आहे. कृषी विभागाच्या पथकांनी केलेल्या नजर पाहणीत जिल्ह्यात ४५२ हेक्टर क्षेत्रावर नुकसान झाल्याचा प्राथमिक अंदाज असून पंचनाम्यांचे काम कृषी विभागाने हाती घेतले आहे. उन्हाळी भातपीकाला सर्वाधिक फटका बसला असून पीक हातचे गेल्याने शेतकरयांना डोक्यावर हात मारून घेण्याची वेळ आली आहे



यावर्षी पहिल्यांदाच अवकाळी पावसाने मे महिन्यात जोरदार बरसात केली. अवकाळीचा जोर ओसरण्यापूर्वीच मान्सून दाखल झाला. आणि मान्सूनच्या पावसाने आपल्या आगमनाची वर्दी देताना रायगडकरांना बेजार करून सोडले. वादळी वारयांसह जोरदार बरणारया पावसाने रायगडला अक्षरशः झोडपून काढले. या पावसाचा सर्वाधिक फटका शेतकरयांना बसला. मे महिन्याच्या अखेरीस जिल्हयात उन्हाळी भातशेतीची कापणी सुरू होती. काही ठिकाणी कापणीची कामे सुरू होती. तर काही भागात कापणी व्हायची होती परंतु त्यापूर्वीच आलेल्या पावसाने सगळं वाहून नेलं. उभे पीक शेतात आडवे झाले. आता या दाण्यांना मोड आले आहेत.

रायगडमध्ये कर्जत, पेण, रोहा आणि माणगाव बरोबरच खालापूर आणि पाली तालुक्यात काही प्रमाणात उन्हाळी भातपीक घेतले जाते. या तालुक्यातील कापलेल्या उन्हाळी भातपीकांचे अवकाळी पावसाने अतोनात नुकसान केले. तर याच तालुक्यात काही प्रमाणात भाजीपाल्याचे नुकसान झाले. पोलादपूर , उरण, पनवेल कर्जत या चार तालुक्यातील आंबा पीक अवकाळीने धोक्यात आले. यात प्रामुख्याने फळगळती, देठकुजवा आणि फळामध्ये साका पडल्याने फळे फेकून देण्याची वेळ बागायदारांवर आली. मात्र यंदा आंब्याचा हंगाम लवकर संपल्याने या नुकसानीचे प्रमाण तुलनेत कमी आहे.

कर्जत, खालापूर, उरण, पनवेल, पेण, रोहा, पोलादपूर, माणगाव या आठतालुक्यांचा नजर पाहणी अहवाल जिल्हा अधिक्षक कृषी कार्यालयाला प्राप्त झाला आहे. या आठ तालुक्यातील ११८ गावांना अवकाळीचा फटका बसला आहे. प्राथमिक अहवालानुसार १०५७ शेतकरी बाधित झाले आहेत. २३ तारखेपर्यंत ४५२.१७ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहेत. यात कर्जत तालुक्यात सर्वाधिक ३८७.१५ हेक्टर क्षेत्र बाधित झाले आहे. उर्वरीत सात तालुकयातील नुकसानीचा अहवाल अद्याप कृषी विभागाला प्राप्त झालेला नाही.

# नैसर्गिक आपत्तीत सर्व यंत्रणांनी सतर्क व सुसज्ज राहावे –मंत्री भरत गोगावले



**महाड : प्रतिनिधी**

आगामी मान्सून कालावधीच्या पार्श्वभूमीवर आज रोजगार हमी योजना, खारभूमी विकास विभाग मंत्री भरत गोगावले यांच्या अध्यक्षतेखाली नैसर्गिक आपत्ती उपाययोजना आढावा बैठक शासकीय विश्रामगृह महाड येथे संपन्न झाली.

यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे,जिल्हा पोलीस अधीक्षक आचल दलाल, मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.मनिषा विखे,कार्यकारी अभियंता महेश नामदे ,जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी सागर पाठक, उपविभागीय अधिकारी पोपट ओमासे, एन डी आर एफ, कोस्ट गार्डचे अधिकारी यांसह जिल्ह्यातील विविध विभागाचे अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते.

दरम्यान मंत्री गोगावले यांनी संबंधित अधिकाऱ्यांकडून जिल्ह्यातील वीज पुरवठा, सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट, पूल दुरुस्ती, रस्ते दुरुस्ती, वाहतूक, कृषी बागायतदारांना नुकसान भरपाई, आरोग्य, नैसर्गिक आपत्ती प्रसंगी उपयोगी पडणारी तात्पुरती निवारागृहे, धोकादायक ठिकाणे व तेथील उपाययोजना, पोलीस व स्थानिक प्रशासनाचे नियंत्रण कक्ष, नागरिकांना देण्यात येणाऱ्या सोयीसुविधा आदी विषयांबाबत सविस्तर आढावा घेतला.

नैसर्गिक आपत्तीत सर्व यंत्रणांनी सतर्क व सुसज्ञ राहावे, आपापसात योग्य तो समन्वय साधावा, जनतेच्या सुरक्षेला सर्वोच्च प्राधान्य द्यावे, आरोग्य यंत्रणेने अधिक सतर्क राहून काम करावे, नागरिकांच्या आरोग्याची आवश्यक ती काळजी घेण्यात यावी, अशा सूचनाही त्यांनी यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

# महाडमध्ये विषारी वायू गळतीने कामगार जखमी; कंपनी प्रशासनावर गुन्हा दाखल

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी मधील इंडो अमाईन्स लिमिटेड या कंपनीत वायू गळती झाल्याने एक तरुण कामगार गंभीर जखमी झाला असून त्याच्यावर महाड येथील रुग्णालयात उपचार सुरू असून हलगर्जीपणा बाळगल्याने कंपनी प्रशासनावरती गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी औद्योगिक वसाहत पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार इंडो अमाईन्स लिमिटेड या कंपनीमध्ये गुरुवार दिनांक २९ मे रोजी सायंकाळी ६:३० वाजेच्या सुमारास गीतेश नागेश शिंदे वय वर्ष २१ राहणार लाडवली हा कामगार काम करीत असताना रिएक्टर मधून विषारी वायूची गळती होऊन सदर कामगार गंभीर जखमी होऊन बेशुद्ध पडला. या जखमी कामगाराला तात्काळ महाड येथील देशमुख नर्सिंग होम या ठिकाणी उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.

कामाच्या ठिकाणी संबंधित कामगारांना चांगल्या प्रतीचे गॉगल तसेच मास्क दिले नसल्याच्या कारणांनी, तसेच कामगारांच्या जीवितास धोका निर्माण केल्याप्रकरणी प्रोडक्शन मॅनेजर रामभाऊ आरोटे, सेफ्टी मॅनेजर सचिन जांभळे तसेच प्लांट मॅनेजर प्रतीक गरुड यांच्या विरोधाते गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी सहाय्यक पोलीस निरीक्षक जीवन माने हे अधिक तपास करीत आहेत.

# वडवळ ग्रामपंचायतीच्या नवीन वास्तूचे उदघाटन

**खोपोली ,चौक : प्रतिनिधी**

खालापुरात असणाऱ्या कोयना प्रकल्प स्थलांतरित वडवळ या ग्रामपांचायतीच्या नवीन इमारतीचे उदघाटन राज्याच्या महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. यावेळी त्यांनी कोयना प्रकल्पग्रस्तच्या प्रलंबित मागण्यांचा शासनदरबारी पाठपुरवठा करणार असल्याचे सांगितले.



वडवळ या पाच कोयना प्रकल्प स्थलांतरित गावाच्या स्वनिधीतून बांधलेल्या नवीन ग्रामपांचायतीच्या वास्तूचे उदघाटन मंत्री आदिती तटकरे यांच्या हस्ते झाले. वडवळ ग्रामपांचायतीच्या स्थापनेपासुन जे सरपंच झाले त्या सर्व सरपंचांचा नामदार अदिती तटकरे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास माजी जिल्हापरिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, माजी जी. प. सभापती उमाताई मुंडे, युवक जिल्हाध्यक्ष अंकित साखरे, तालुका अध्यक्ष संतोष बैलामारे, यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस चे अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते. तर वडवळ ग्रामपंचायतीचे ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.तर तालुक्यातील सर्व विभागाचे शासकीय अधिकारी हजर होते.

माजी सरपंच विठ्ठल मोरे यांनी कोयना प्रकल्प ग्रस्ताच्या प्रलंबित मागाण्यांबद्दल बोलताना मंत्री अदिती तटकरे यांनी लक्ष घालावे अशी मागणी केली. तेव्हा बोलताना मंत्री अदिती तटकरे यांनी सांगितले की कोयना प्रकल्प ग्रस्ताच्या मागण्या टप्प्या टप्प्या ने पूर्ण होत आहेत पण तरीही उर्वरित मागण्यांसाठी त्या शासन दरबारी पाठपुरावा करणार असल्याचे सांगितले.

# ‘इंग्रजांच्या नोंदीत अहिल्याबाई होळकरांचा चुकीचा इतिहास’

**कर्जत : प्रतिनिधी**

इंग्रजांनी केलेल्या नोंदी मध्ये पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचा चुकीचा इतिहास सांगितला जातो. अहिल्याबाई होळकर यांच्या राज्यात दुष्काळ पडला म्हणून बोलले जात आहे. परंतु त्या नोंदीचा विचार केल्यास अहिल्याबाई होळकर यांनी ज्या ज्या गावावर राज्य केले त्या गावात कधीही दुष्काळ पडला नाही. असे चित्र होते.’ असे प्रतिपादन भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी येथे केले.



भारतीय जनता पार्टी पक्षाकडून राज्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची त्रिशताब्दी जयंती उत्साहात साजरी केली जात असून यानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. ३१ मे रोजी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांची जयंती असून कर्जत तालुक्यात कशेळे ग्रामीण मंडळ विभागाकडून कशेळे येथे अहिल्याबाई होळकर यांच्यावर आधारित स्पर्धा परीक्षा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा, वेशभूषा स्पर्धा आणि दहावी आणि बारावी गुणवंत विद्यार्थ्यांच्या सत्काराचे आयोजन करण्यात आले होते.

कशेळे ग्रामीणचे मंडळ अध्यक्ष दिनेश रसाळ आणि रामदास घरत त्याच बरोबर ग्रामीणचे भाजप पदाधिकारी यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते. या कार्यक्रमाला भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष वसंत भोईर, राजेश लाड, सरचिटणीस दीपक बेहेरे, माजी उपनगराध्यक्ष अशोक ओसवाल, कर्जत मंडल अध्यक्ष नरेश मसणे, रमेश मुंडे, मंगेश म्हसकर, राजेश भगत, माजी नगरसेवक बळवंत भुमरे, बिनिता घुमरे, महिला मोर्चा अध्यक्षा संगीता हरपूडे, नम्रता कांदळगावकर, सुप्रिया भगत, ऍड सुषमा ढाकणे आदी उपस्थित होते.

स्पर्धेचे परीक्षक म्हणून मंगेश सावंत आणि मृणालिनी खेडकर यांनी काम पाहिले. वकृत्व स्पर्धे मध्ये अशोक भगत या स्पर्धकाने प्रेक्षकांची मने जिंकून घेतली. कर्जत तालुक्यात पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांचे चरण स्पर्श झाले आहे. कोठिंबे येथे त्यांनी विहीर, बाराव खोदले त्यांची आजही साक्ष देत आहेत. महिलांसाठी सुरू केलेले कार्य हे विसरणारे नसून आपल्या राज्यप्रती त्यांची निष्ठा सर्व काही सांगून जाते म्हणून अहिल्याबाई होळकर यांच्या आठवणींना उजाळा दिला. वकृत्व स्पर्धेमध्ये अशोक भगत यांना प्रथम, वेशभूषा स्पर्धेमध्ये अस्मिता जाधव हिला प्रथम, निबंध स्पर्धेमध्ये अपेक्षा करडे हिला प्रथम पारितोषिक देऊन सन्मानित करण्यात आले. यावेळी दहावी आणि बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी राजेश लाड, दीपक बेहेरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

# नेरळ विद्यामंदिर सौर ऊर्जेवर चालणारी शाळा बनेल –आ. म्हात्रे

**कर्जत : प्रतिनिधी**

नेरळ विद्यामंदिर शाळेला दोन एकर एवढी करोडो रुपयांची जमीन दान करणाऱ्या शांताबाई नाडकर्णी आजी या ग्रेट पर्सनॅलिटी आहेत. कोकण विभाग मतदारसंघातील सर्व अनुदानित शाळा या डिजिटल करण्यासाठी आपला आमदार निधी खर्च केला आहे. आगामी चार वर्षाच्या काळात पाच जिल्ह्यातील सर्व अनुदानित शाळा या सौर ऊर्जे वर चालणाऱ्या शाळा असतील. या शाळेच्या पहिली ते चौथी पर्यंतची शाळेची अंतिम मान्यता आणली जाईल नेरळ विद्या मंदिर ही शाळा माझी असून ही अनुदानित शाळा सौर ऊर्जे वर वीज पुरवठा करणारी शाळा असेल.’ असे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांनी जाहिर केले.

विद्या मंदिर मंडळाच्या नेरळ ममदापूर येथील प्रांगणात शांताबाई नाडकर्णी आजी यांच्या स्मारकाचे उद्घाटन उद्घाटन कोकण शिक्षक मतदारसंघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांचे हस्ते करण्यात आले. विद्या मंदिर मंडळ संस्थेचे उपाध्यक्ष अरुण धारप, संस्थेचे कार्याध्यक्ष शशिकला मुळ्ये, कोषाध्यक्ष सुरेश देशमुख, माजी अध्यक्ष डॉ भारतकुमार लाड, डॉ मिलिंद पोतदार, संस्थेचे संयुक्त सचिव विवेक पोतदार, कार्यकारिणी सदस्य दिलीप गडकरी, नरेश कुंभार आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष अरुण धारप यांनी ’शांताबाई नाडकर्णी यांनी कधीही शाळेला आपले नाव द्यावे असे सूचित केले नाही.’ अशी माहिती दिली.

पान १ वरुन

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त आजपासून पनवेलमध्ये भव्य कीर्तन महोत्सव

३१ मे रोजी दुपारी २ वाजता या महोत्सवाची सुरुवात प्रतिमा पूजा, वीणा, टाळ आणि पखवाज पूजनाने होणार आहे. त्यानंतर ३ वाजता रायगडभूषण पं. उमेश चौधरी यांचे भजन, सायंकाळी ४ वाजता ५० हरिपाठ मंडळांचा सामुदायिक हरिपाठ, त्यानंतर ५.३० वाजता आदरणीय गुरूतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार सोहळा, ७ वाजता हभप उमेशमहाराज दशरथे (परभणी) यांचे हरिकीर्तन, त्यानंतर रात्री ९ वाजता महाप्रसाद आहे.

१ जून रोजी दुपारी २.३० वाजता शिवशंभो प्रासादिक मंडळ (चिंचिवली गोहे) यांचे भजन, सायंकाळी ४ वाजता ४५ हरिपाठ मंडळांचा सामुदायिक हरिपाठ, ५.३० वाजता आदरणीय गुरूतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार, ७ वाजता संत माणकोजीमहाराज बोधले यांचे अकरावे वंशज हभप ॲड. जयवंतमहाराज बोधले (पंढरपूर) यांचे हरिकीर्तन, रात्री ९ वाजता महाप्रसाद आहे.

२ जून रोजी दुपारी २.३० वाजता नादब्रह्म साधना भजन मंडळाचे भजन, सायंकाळी ४ वाजता ४६ हरिपाठ मंडळांचा सामुदायिक हरिपाठ, ५.३० वाजता आदरणीय गुरूतुल्य सत्कारमूर्ती कीर्तनकार महाराजांचा सत्कार, ७ वाजता हभप विश्वनाथ महाराज वारिंगे (अंबरनाथ) यांचे हरिकीर्तन, वाढदिवसानिमित्त लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा अभीष्टचिंतन सोहळा आणि रात्री ९ वाजता महाप्रसाद आहे, अशी माहिती लोकनेते रामशेठ ठाकूर अमृत महोत्सव समितीच्या वतीने देण्यात आली.

## कला जोपासा, किर्तीवंत व्हाल!

माजी सभागृह नेते परेश ठाकूर म्हणाले, या अभिनय शिबिराच्या माध्यमातून महापालिका जनतेशी संवाद साधण्याचा प्रयत्न करते आहे. जनतेसाबत जाऊन सर्वाशी पालक या नात्याने जवळ जात आहे. मराठी नाट्यसंस्कृती रूजावी, संस्कृती बहरावी यासाठी महापालिका प्रयत्न करत असल्याने आनंद होत आहे. त्यांनी सर्व शिबिरार्थिंना ‘नाट्यशास्त्राची ओळख’ हे पुस्तक भेट दिले तसेच या शिबिराप्रमाणे लवकरच खारघर परिसरातही अशा प्रकारच्या अभिनय प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.



या अभिनय प्रशिक्षणाच्या माध्यमातून पनवेलमध्ये महापालिका बालकांमध्ये नाट्यगुण रूजविण्यासाठी अशा उत्तम प्रकारच्या उपक्रमाचे आयोजन करते हे विशेष असल्याचे अभिनेते प्रकाश राणे यांनी सांगून भविष्यात मोठे रंगकर्मी होण्याचा आशीर्वाद मुलांना दिला.

या वेळी सर्व रंगकर्मीयांमार्फत लोकनेते रामशेठ ठाकूर यांना त्यांच्या २ जूनला साजरा होणाऱ्या वाढदिवसासाठी मनःपूर्वक शुभेच्छा देण्यात आल्या. समारोप कार्यक्रमात आठ दिवस अभिनय प्रशिक्षण घेतलेल्या सिनिअर आणि ज्युनिअर गटातील प्रशिक्षणार्थींना मान्यवरांच्या हस्ते प्रमाणपत्र देण्यात आले. प्रशिक्षकांच्या वतीने अभिनेते अशोक केंद्रे यांनी पनवेलमध्ये उत्तम कलावंत असल्याचे सांगितले. उपस्थित प्रशिक्षणार्थींनीही आपल्या मनोगतामध्ये अभिनय शिबिर घेतल्याबद्दल महापालिका आणि नाट्य परिषदेचे आभार मानले.
कार्यक्रमाचे प्रास्ताविक नाट्य परिषद पनवेल शाखेचे कार्यवाह शामनाथ पुंडे यांनी केले. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार उपायुक्त प्रसेनजित कारलेकर यांनी मानले. दरम्यान, या आयोजनाबद्दल आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांनी नाट्य परिषदेचे अभिनंदन केले आहे.

# विनय नारायण, गायत्री पन्हाळकर, अशोक जाधव, हेमंत चव्हाण यांना अंबुद पुरस्कार

**मुंबई : प्रतिनिधी**

ज्येष्ठ लेखक विनय नारायण, साहित्यप्रेमी अशोक जाधव, वाचन संस्कृतीसाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणारे हेमंत चव्हाण आणि मराठीतपैकीच्या पैकी गुण मिळवणारी विद्यार्थिनी गायत्री पन्हाळकर यांना यंदाचा अंबुद पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे.



स्वामीराज प्रकाशन आणि पल्लवी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने दर वर्षी अंबुद या पावसाळी उत्सवाचे आयोजन करण्यात येते. साहित्य, नाट्य आणि संगीत विषयक विविध कार्यक्रम या उत्सवात सादर केले जातात. प्रबोधन प्रयोगघर, कुर्ला येथे होणाऱ्या या उत्सवात रसिकांना मुक्त प्रवेश तर असतोच, पण वाफाळलेला चहा आणि गरमागरम कांदा भजीचा आस्वादही घेता येतो. यंदाचा उत्सव १२/१३/२६ आणि २७ जुलै रोजी होणार असून मराठी भाषेसाठी विशेष कार्य करणाऱ्या चार व्यक्तींना यंदाही खास पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे.

यंदाच्या अंबुद पुरस्काराचे पहिले मानकरी आहेत प्रसिद्ध लेखक विनय नारायण. इंग्रजी शाळेतील विद्यार्थ्यांना मराठी वाचनाची गोडी लागावी यासाठी विनय नारायण यांनी एक अभिनव पुस्तक प्रयोग केला आहे. दुसरे मानकरी आहेत हेमंत चव्हाण. करिरोड सारख्या गिरणगावात पुन्हा एकदा वाचन संस्कृती रुजावी यासाठी चव्हाण यांनीही अभिनव प्रयोग केला असून गायत्री पन्हाळकर ही विद्यार्थिनी पुरस्काराची तिसरी मानकरी आहे. बारावी परीक्षेत मराठी विषयात गायत्री हिने शंभर पैकी शंभर गुण मिळवले आहेत. तर माजी पोलिस निरीक्षक अशोक जाधव हे साहित्यप्रेमी आणि सजग वाचक म्हणून साहित्य वर्तुळात ओळखले जातात. ते पुस्तक विकत घेऊनच वाचतात हे विशेष! मराठी भाषेसाठी आनंददायी ठरणाऱ्या या पुरस्कारांची घोषणा आज स्वामीराज प्रकाशनचे रजनीश राणे आणि पल्लवी फाउंडेशनचे डॉ. भाऊ कोरगावकर यांनी एका संयुक्त पत्रकाद्वारे केली.

# स्थानिक कर्मचाऱ्यांना डावलून काम करू देणार नाही

## भाजपकडून झेप्टो कंपनीला इशारा





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

स्थानिक कर्मचाऱ्यांना डावलून कोणतेही काम करू देणार नाही तसेच जोपर्यंत प्रश्न सुटत नाही तोपर्यंत झेप्टो स्टोअरमधून एकही डिलेव्हरी होणार नाही याची आम्ही दक्षता घेऊ, असा इशारा भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव यांनी दिला आहे.

पनवेलमधील झेप्टो कंपनीमध्ये डिलिव्हरीचे काम करणाऱ्या स्थानिक कर्मचाऱ्यांवर झेप्टो कंपनीमार्फत अन्यान केला जात आहे. त्यांना कोणत्याही प्रकारची पुर्व कल्पना न देता त्यांच्या डिलेव्हरीचे पैसे कमी करण्याचा मनमानी निर्णय झेप्टो कंपनीमार्फत घेण्यात आला होता. या पार्श्वभुमीवर सर्व कर्ममाऱ्यांनी आमदार प्रशांत ठाकूर यांची भेट घेतली होती. त्यानुसार आमदार प्रशांत ठाकूर यांनी भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमीत झुंझारराव यांना या प्रश्ना संदर्भात पाठपुरवा करण्याचे निर्देश दिले होते. त्यानुसार सुमित झुंझारराव यांनी भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांसह झेप्टो स्टोअरला भेट देऊन कंपनीच्या व्यवस्थापनाला जाब विचारला.

या वेळी त्यांनी भारतीय जनता पक्ष ही स्थानिक कर्मचाऱ्यांच्या मागे ठाम पणाने उभी असल्याची ग्वाही दिली. दरम्यान, झेप्टो कंपनीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांची आमदार प्रशांत ठाकूर यांच्यासोबत चर्चा झाली असून येत्या ३ जून रोजी आमदार प्रशांत ठाकूर आणि झेप्टो कंपनीच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांची बैठक होणार आहे. त्यामुळे तो पर्यत्त कर्मचाऱ्यांनी जे पैसे पुर्वी मिळत होते. त्याच दराने देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

या वेळी भाजपचे पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, उमेश, रूपेश नागवेकर, प्रवीण मोरबाले यांच्यासह भाजपचे कार्यकर्ते उपस्थित होते.

# 'जेबीएसपी'तर्फे ऑनलाईन निबंध लेखन स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

राज्यमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या (जेबीएसपी) माध्यमातून विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन निबंध लेखन स्पर्धेचे आयोजन शुक्रवारी (दि.३०) करण्यात आले होते. संस्थेचे संचालक संजय भगत यांच्या मार्गदर्शनाखाली ही स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

विद्यार्थ्यांमध्ये लेखन कौशल्ये विकसित व्हावीत आणि त्यांना अहिल्याबाई होळकर यांच्या कार्याची माहिती मिळावी, या उद्देशाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत खारघर मधील रामशेठ ठाकूर पब्लीक स्कूल मधील ७००, सीकेटी इंग्लीश मिडीयम मधील ३००, सीकेटी ज्युनीयर कॉलेज मधील ४०० आणि



द्रोणागिरी येथील भागू बाई चांगू ठाकूर विद्यालयातील १२९ विद्यार्थ्यांनी प्राचार्य निशा नायर, प्राचार्य संतोष चव्हाण आणि प्रशांत मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली सहभाग घेतला.

या स्पर्धेचे उत्कृष्ठ आयोजन केल्याबद्दल संस्थेचे चेअरमन रामशेठ ठाकूर, व्हाईस चेअरमन वाय. टी. देशमुख, संचालक मंडळ सदस्य आमदार प्रशांत ठाकूर, सचिव डॉक्टर एस. टी. गडदे यांनी कौतुक केले आहे.



**ठाणे : माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या ७५व्या वाढदिवसानिमित्त आगरी दर्पण मासिकाने त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून विशेषांक काढला आहे. या अंकाचे प्रकाशन शुक्रवारी लोकनेते दि.बा.पाटील विमानतळ नामकरण आंदोलनातील कार्यकर्त्यांच्या ठाणे येथे झालेल्या सभेच्या वेळी समाजाचे नेते जगन्नाथ पाटील, दशरथ पाटील, जे.एम.म्हात्रे, जे.डी.तांडेल, दीपक म्हात्रे व ठाणे, पनवेल, उरण, नवी मुंबई, मुंबई येथील कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत करण्यात आले.**

# निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेला प्रतिसाद; मान्यवरांकडून शुभेच्छा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष पनवेल शहर मंडळाच्या वतीने पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त निबंध आणि वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन गुरुवारी (दि.२९) करण्यात आले होते. या स्पर्धेला शकुंतला रामशेठ ठाकूर आणि भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी भेट घेऊन स्पर्धकांना शुभेच्छा दिल्या.

मिडलक्लास हौसिंग सोसायटीतील गणपती मंदिराच्या सभागृहात या स्पर्धा झाल्या. वक्तृत्व स्पर्धेत सहभाग घेतलेल्या स्पर्धकांनी अहिल्याबाई होळकर यांच्या जीवनकार्यावर आणि त्यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. निबंध स्पर्धेत २५, तर वक्तृत्व स्पर्धेत १५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या वेळी शकुंतला रामशेठ ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी , पनवेल शहर मंडळ अध्यक्ष सुमित झुंझारराव, उपाध्यक्ष केदार भगत, सरचिटणीस रूपेश नागवेकर, चिटणीस प्रशांत शेट्ये, कोषाध्यक्ष प्रवीण मोरबाळे, कोमल कोळी, देवांशू प्रभाळे, अनिमेश पटवर्धन, हर्षल बहाडकर उपस्थित होते.



**उरण : नगर परिषद माजी नगरसेवक नंदकुमार लांबे यांना वाढदिवसानिमित्त आमदार महेश बालदी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजपचे माजी तालुका अध्यक्ष रवी भोईर, माजी नगरसेवक कौशिक शाह, तालुका सरचिटणीस सुनील पाटील, चाणजे विभाग अध्यक्ष जितेंद्र घरत, प्रदीप नाखवा, उरण शहर युवा अध्यक्ष निलेश पाटील आदी उपस्थित होते.**



# मोहोपाडा मुख्य रस्ता डागडुजीची मागणी

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

दांड-रसायनी रस्त्यावरील मोहोपाडा प्रवेशद्वाराच्या रस्त्यात खड्डे पडले आहेत. या रस्त्यावरून रसायनी पाताळगंगा औद्योगिक क्षेत्राकडे वाहनांची रोजची रेलचेल असल्याने मोठ्या अपघातांची शक्यता नाकारता येत नाही.

दांड-रसायनी रस्त्याला जागोजागी खड्डे पडले आहेत. मोहोपाडा प्रवेशद्वारासमोर रस्त्यावरील खडी बाहेर आल्याने दुचाकी घसरुन अपघात होत आहेत. या रस्त्यावरून प्रवास करताना वाहनचालकांना आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागतो. या रस्त्यावर अपघात होऊन वाहनचालकांना जखमी व जीवितहानी होण्याचा धोका वाढला असून महाराष्ट्र शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने दखल घेवून घ्यावी, अशी मागणी प्रवासी व नागरिकांतून होत आहे.






## संपादकीय

# जागरूकतेचा अभाव

'गतिमंद' म्हटल्या जाणाऱ्या लहान मुलाला वा प्रौढ व्यक्तीला कुटुंबियांनी अमानुष पद्धतीने बांधून ठेवल्याच्या, जनावराप्रमाणे वागणूक दिल्याच्या घटना विशेषत: ग्रामीण भागातून अधुनमधून उजेडात येतात. बरेचदा काय असते अशा घटनांमागील वास्तव?

**कोल्हापुरातील राजारामपुरी येथे एका ४० वर्षीय महिलेला घरातील सदस्यांनी दीड महिन्यापासून साखळदंडाने बांधून ठेवल्याचे आढळून आले असून पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर त्यांनी या महिलेची सुटका केली. ही महिला गतिमंद असल्यामुळे तिचा भाऊ, वहिनी व भाच्याने मिळून तिला बांधून ठेवल्याचे ग्रामस्थांनी सांगितले. पोलिसांनी या तिघांविरोधातही गुन्हा नोंदवला असून महिलेला रुग्णालयात दाखल केले आहे. पीडित महिला 'गतिमंद' असून तिचा आसपासच्या लहान मुलांना त्रास होत होता. ही महिला रस्त्यावरील काहीही खात होती असे शेजाऱ्यांनी सांगितले. कारणे काहीही असली तरी तिला अशातऱ्हेने बांधून ठेवणे चुकीचे असल्याचे पोलिसांनी म्हटले आहे. 'गतिमंद' म्हटल्या जाणाऱ्या लहान मुलांना वा प्रौढ व्यक्तीला कुटुंबियांनी बांधून ठेवल्याच्या घटना विशेषत: ग्रामीण भागातून अधुनमधून उजेडात येत असतात. कोल्हापुरातील घटनेबद्दल उमटली तशीच संतापाची प्रतिक्रिया अशा घटनांच्या संदर्भात नेहमी उमटते. कुटुंबियांनी बाधित व्यक्तीशी निष्ठूरपणे वागू नये अशी समाजाची अपेक्षा असते, जी योग्यच आहे. अशा व्यक्तींचे वागणे कुटुंबियांना व शेजारीपाजारीही बराच त्रास होईल असे असू शकते. कुठेही जाणे, चावणे-किंचाळणे, स्वत:ला वा इतरांना इजा होईल असे वागणे अशा अनेक वर्तन समस्या त्यांना असू शकतात. शेजाऱ्यांकडून त्यावर बहुदा संतप्त प्रतिक्रियाच उमटते. कुटुंबियांना तो त्रासही सहन करावा लागतो. मग शेजारी त्रास होऊ नये यासाठी वाट्टेल ते पर्याय निवडले जातात. बाधित व्यक्तीला 'गतिमंद' असे सरधोपट लेबल सर्वसामान्यांकडून लावले जात असले तरी वेळीच सुयोग्य तपासणी झाल्यास त्यांना तीव्र स्वरुपाचा ऑटिझम (स्वमग्नता), अटेंशन डेफिसिट हायपर-क्टिव्हिटी डिसऑर्डर (एडीएचडी), सेन्सरी प्रोसेसिंग डिसऑर्डर, स्किझोफ्रेनिया वा इतर बौद्धिक/मानसिक विकारांपैकी नेमका कोणता विकार आहे हे कळू शकते. खेडोपाडीच्या वा निमशहरी भागातील अनेकांच्या बाबतीत ना त्यांच्या विकाराचे असे काही निदान झालेले असते, ना कुठले उपचार त्यांना दिले जातात. कोल्हापुरातील ही 'गतिमंद' म्हटली गेलेली महिला ४० वर्षांची आहे. म्हणजे तिच्या लहानपणी ग्रामीण भागात अशा विकारांविषयी जागरुकता असण्याची शक्यता कमीच आहे. विकाराचे निदान नाही, उपचार नाहीत, कुटुंबियांना अशा व्यक्तीचे वर्तन कसे हाताळावे, नियंत्रित करावे याची कुठलीही नीट माहिती नाही अशा अवस्थेत अशा व्यक्तीमध्ये वर्तणुकीच्या अनेक समस्या आणखीनच तीव्र होण्याची शक्यता असते. महिलेचे वय लक्षात घेता आधी तिची काळजी घेणारे तिचे आईवडीलही बहुदा आता हयात नसावेत. नेहमी काळजी घेणारी व्यक्ती सोबत नसल्यासही अशा बाधित व्यक्तींच्या वर्तणुकीच्या समस्या आणखी तीव्र होऊ शकतात. आईवडिलांच्या पश्चात अशा व्यक्तीची नीट काळजी घेतली जावी यासाठी आज देशभरातील बड्या शहरांच्या समीप खाजगी निवासी संस्था उभ्या राहात आहेत. पण सध्या तरी त्या फक्त उच्चभ्रू वर्गातील कुटुंबांना परवडतील अशाच आहेत. गरीब बाधितांसाठीच्या संस्था, अनाथाश्रम आहेत. पण तिथली परिस्थिती बहुदा भयावह म्हणावी अशीच असते. त्यामुळेच वर्तणूक समस्या नियंत्रणापलीकडे गेल्यानंतर अशा व्यक्तीचा सांभाळ करायचा तरी कसा या प्रश्नाशी अनेक कुटुंबे रोजच्या रोज झगडत असतात.**

# कागदी लग्न पत्रिकेचा ट्रेंड पडला मागे!

भारतात अनेक परंपरा व रीती रिवाज आहेत. भारतीय संस्कृतीत लग्न हा एक संस्कार मानला गेला आहे. कालांतराने लग्न व त्या संबंधित काही रितिरिवाज मध्ये बदल घडत होत आहेत.लग्न म्हणजे लग्न पत्रिका आली. लग्न पत्रिके शिवाय लग्नाचा विचार करूच शकत नाही. लग्नाचा अविभाज्य घटक म्हणजे लग्न पत्रिका. पूर्वी घरोघरी जाऊन लग्न पत्रिका देऊन घरातील नातेवाईक, मित्र मंडळी यांच्याशी योग्य तो संवाद साधला जायचा.




अगोदर लग्न या महत्वाच्या विधी पूर्वी लग्नाची छापील लग्न पत्रिका हे नातेवाईकांच्या घरी प्रत्यक्ष भेट देत दारात अक्षता ठेवून दिले जायचे. बदलत्या काळात छापील लग्न पत्रिकांची जागा आता डिजिटल लग्न पत्रिकेने घेतली आहे. आता तरी लग्नपत्रिका ही ऑनलाईन झाल्याने कागदी लग्नपत्रिकांचा ट्रेंड मागे पडत असल्याचे चित्र अनेक ठिकाणी दिसत आहे.

अलीकडच्या काळात तंत्रज्ञानाने झपाट्याने प्रगती केली यामुळे प्रत्येक क्षेत्रात आमुलाग्र बदल झाला. आधुनिक तंत्रज्ञानाच्या युगात निमंत्रणही ऑनलाईन झाले आहे. पूर्वीच्या काळी नातेवाईकांच्या घरी जाऊन निमंत्रण दिले जात होते त्यानंतर साध्या पद्धतीच्या पत्रिका छापून घरपोच घेऊन जायची या निमंत्रण नातेवाईक सन्मानाची निमंत्रण समजत होते. त्यामुळे पूर्ण कुटुंब त्या कार्यात सहभागी होत असे.

आता ऑनलाईन पत्रिका पाठविण्याचे ट्रेंड सुरु आहे.लग्नाच्या अगोदर इच्छुक पती पत्नी यांना एकत्र बोलावून फोटो काढण्याचे प्रमाण वाढले आहे. याला प्री वेडींग शूटिंग असे म्हणतात.प्री वेडिंग शूटिंगचे मार्केट झपाट्याने विस्तारत असताना ऑनलाईन निमंत्रण देण्याला चांगलेच महत्त्व आले आहे. विशेषत: तरुणांचा सोशल साइटवर डिजिटल लग्न पत्रिका टाकण्याकडेही कल वाढला आहे. विशेष म्हणजे लिखित पत्रिकेची थेट दृकश्राव्य स्वरूपातील निमंत्रण दिले जात आहे

### मोबाईल क्रांतीचा फायदा

पूर्वी घरोघर आणि गावोगावी जाऊन लग्नपत्रिका वितरित करावी लागत असेल लग्नाचे दिवस जसे जवळ आले त्यात कोणाकडे निमंत्रण पत्रिका पोहोचली नाही याची चिंता लागलेली असायची.आता मोबाईल क्रांतीमुळे ही चिंता मिटली आहे. शिवाय ऑनलाइन पत्रिकांचे विविध प्रकार उपलब्ध असल्याने पत्रिकेत पाहिजे तसे बदल करता येतात. नवनवीन पद्धतीचा नागरिकांनी स्वीकार केला असून नागरिकांनी चालत्या काळानुसार व गरजेनुसार बदल स्वीकारल्याने लग्न पत्रिकेचा अट्टहास आताच कमी होत चालल्याचे चित्र आहे.

### खर्चात झाली बचत

सोशल मीडियावर लग्न पत्रिका पाठवून फोन करून कळविली जाते. त्यामुळे शेकडो पत्रिका छापण्यात येणाऱ्या लग्न पत्रिका आता केवळ ५०-१०० छापल्या जात असल्याने आता लग्न पत्रिका प्रत्यक्ष भेटून देण्याची पद्धत मागे पडू लागली आहे

**माझ्या लग्नाला व्हाट्सअप सारख्या सोशल मीडियाच्या प्लॅट फॉरवर आमंत्रण देण्यामुळे प्रचंड वेळ वाचला आणि सर्वांनी हजेरी लावली.खर्चही कमी प्रमाणात झाला. यास नातेवाईकासह मित्रमंडळींनी प्रचंड प्रतिसाद दिला आहे. सोशल मीडियाचा वापर केल्याने माझा वेळ व पैशाची बचत झाली आहे. शिवाय चांगला प्रतिसादही मिळाला आहे.**

**-संगम पाटील, उरण**

(संकलन : विठ्ठल ममताबादे)

# आज जागतिक तंबाखू विरोधी दिन

दरवर्षी ३१ मे रोजी तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो. हा दिवस साजरा करण्याची गरज भासू लागली, या दिवसाचे महत्त्व काय आहे हे जाणून घेऊयात.

तंबाखूचे सेवन आरोग्यासाठी घातक ठरू शकते. तंबाखू किंवा धूम्रपानामुळे व्यक्तीच्या मानसिक आरोग्यावर तसेच शारीरिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो. तथापि, हे माहीत असूनही, जगभरातील मोठ्या संख्येने लोक कोणत्या ना कोणत्या स्वरूपात तंबाखूचे सेवन करत आहेत. लोकांमध्ये बिडी, सिगारेट, गुटखा इत्यादींच्या सेवनाने अनेक आजारांचा धोका वाढतो. अशा स्थितीत तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या हानीबाबत लोकांना जागरुक करण्याच्या उद्देशाने जागतिक तंबाखू विरोधी दिन दरवर्षी जगभरात साजरा केला जातो. तंबाखू निषेध दिन केव्हा आणि का साजरा करण्याची गरज भासू लागली, या दिवसाचे महत्त्व जाणून घेऊयात...

खरे तर तंबाखू सेवनामुळे होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येत सातत्याने वाढ होत असल्याने जागतिक आरोग्य संघटनेने १९८७ मध्ये तंबाखू निषेध दिवस साजरा करण्याचा निर्णय घेतला. पुढच्या वर्षी म्हणजे १९८८ मध्ये पहिल्यांदा जागतिक तंबाखू विरोधी दिन एप्रिल महिन्यात साजरा करण्यात आला. मात्र, नंतर तो साजरा करण्यासाठी मे महिन्यात तारीख निश्चित करण्यात आली.



दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन साजरा केला जातो. १९८८ मध्ये मे महिन्याच्या शेवटच्या दिवशी तो साजरा करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. तेव्हापासून दरवर्षी ३१ मे रोजी जागतिक तंबाखू विरोधी दिन म्हणून तंबाखूचे सेवन थांबवण्यासाठी आणि त्यामुळे होणाऱ्या समस्यांची जाणीव करून देण्यासाठी साजरा करण्यात आला.

तज्ज्ञांच्या मते, तंबाखूच्या सेवनामुळे अनेक गंभीर आणि जीवघेण्या आजारांचा धोका वाढतो. फुफ्फुसाचा कर्करोग, यकृताचा कर्करोग, तोंडाचा कर्करोग, आतड्याचा कर्करोग आणि गर्भाशयाचा कर्करोग होण्याचा धोका असतो. याशिवाय हृदयविकार आणि इरेक्टाइल डिसफंक्शनसारखे आजारही होऊ शकतात.

तंबाखू सेवनामुळे होणारे आजार आणि मृत्यूच्या वाढत्या आकडेवारीमुळे जागतिक आरोग्य संघटनेने १९८७ मध्ये जागतिक तंबाखू विरोधी दिन सुरू केला. हा दिवस ७ एप्रिल १९८८ रोजी पहिल्यांदा साजरा करण्यात आला. यानंतर, दरवर्षी ३१ मे रोजी हा दिवस साजरा केला जाऊ लागला. हा दिवस साजरा करण्यामागचा उद्देश लोकांना तंबाखूच्या सेवनामुळे होणारे नुकसान सांगणे हा आहे.

जागतिक तंबाखू विरोधी दिन दरवर्षी कोणत्या ना कोणत्या थीमवर साजरा केला जातो. पर्यावरणाचे रक्षण करा ही यावर्षीची थीम आहे. गेल्या वर्षी जागतिक तंबाखू विरोधी दिनाची थीम कमिट टू क्विट होती. हा खास दिवस साजरा करण्यासाठी दरवर्षी कार्यक्रम आयोजित केले जातात. या दरम्यान तंबाखू सेवनामुळे होणारे नुकसान आणि त्याची सवय सोडण्याबाबत सर्व प्रकारची माहिती दिली जाते. या कार्यक्रमांमध्ये तरुणाईचाही सक्रिय सहभाग असतो. त्यांनाही याबाबत समजावून सांगितले आहे. तंबाखूचे सेवन केल्याने कर्करोगासारख्या गंभीर आरोग्य समस्या उद्भवू शकतात. दरवर्षी लाखो लोकांचा तंबाखू सेवनामुळे मृत्यू होतो. जागतिक तंबाखू विरोधी दिनानिमीत्त, तंबाखूचे नुकसान सांगून लोकांना तंबाखू सोडण्यास प्रवृत्त केले जाते. **(साभार : इंटरनेट)**



## बदलते तंत्रज्ञान

# मृत्यूनंतर तुमच्या सोशल मीडियाचं नक्की काय होतं?

माणसाच्या मृत्यूनंतर त्याच्या नावावर असणारी सर्व संपत्ती आणि जमीनिची वाटणी केली जाते. ही वाटणी माणसाने लिहीलेल्या मृत्यूपत्रानुसार होते किंवा त्यांनी आधीच सांगितलेल्या त्याच्या इच्छेनुसार. संपत्ती आणि जमिनीची वाटणी तर केली, पण डिजीटल जगात असणाऱ्या ऑनलाईन डेटाचं काय? संपत्ती एवढाच सोशल मीडिया आणि डिजीटल मीडिया डेटा देखील महत्त्वाचा आहे. सोशल मीडिया आणि डिजीटल मीडिया डेटाला डिजिटल सपंत्ती म्हटलं जातं. पण व्यक्तीच्या मृत्यूनंतर या डिजिटल संपत्तीचं काय होतं, याबद्दल अनेकांना माहिती नसते.



डिजिटल संपत्ती दोन भागांमध्ये विभागली जाऊ शकते. ज्यामध्ये डिजिटल मालमत्ता आणि डिजिटल उपस्थिती यांचा समावेश आहे. वेबसाइट डोमेन, ऑनलाइन बिजनेस, क्रिप्टोकरेंसी, डिजिटल फाइल आणि मोनेटाइज्ड सोशल मीडिया अकाउंट्स यांचा डिजीटल संपत्तीमध्ये समावेश होतो. ही सर्व डिजिटल संपत्ती पासवर्डने सुरक्षित केलेली असते. डिजिटल उपस्थितीमध्ये सोशल मीडिया प्रोफाइल्स, फोटो, व्हिडीओ, ईमेल्स, चॅट्स आणि क्लाउडमध्ये सेव्ह करण्यात आलेल्या सर्व आठवणींचा समावेश होतो. या गोष्टींना भावनात्मक महत्व असते. सध्या डिजिटल उपस्थितीमध्ये आरोग्य ॲप्समधून काढलेला डेटा, तुमची लोकेशन हिस्ट्री, सर्च पॅटर्न आणि अगदी एआय द्वारे तयार केलेले व्हर्च्युअल अवतार यासारख्या अनेक गोष्टी जोडल्या गेल्या आहेत. ज्या प्रकारे आपण आपल्या संपत्तीची वाटणी करतो, त्याच पद्धतीने आपण डिजीटल संपत्तीच्या वाटणीची प्लॅनिंग करणं देखील गरेजचं आहे. जर असं केलं नाही तर तुमच्या आठवणी तुमच्या प्रिय व्यक्तिंपर्यंत कधीच पोहोचणार नाहीत.

जर तुम्ही डिजीटल संपत्तीचं वाटप कशा प्रकारे करायचं आहे, याबाबत निर्णय घेतला नाही तर तुमच्या प्रियजनांना तुमच्या अकाउंट्स आणि डेटापर्यंत पोहोचणं खूप कठिण होणार आहे. कधीकधी कंपन्यांच्या अटी आणि शर्ती असतात ज्या फक्त अकाउंट धारकालाच उपलब्ध असतात आणि त्यांच्या मृत्यूनंतर, डेटा काढण्यासाठी किंवा प्रोफाइल हटविण्यासाठी मृत्यू प्रमाणपत्रासारखी कागदपत्रे आवश्यक असतात. जेव्हा अशी योजना अस्तित्वात नसते, तेव्हा कुटुंबांना जुन्या कागदपत्रांमध्ये पासवर्ड शोधणे, रिकवरी टूल्सचा वापर करावा लागतो.

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर

एक अतिशय दानशूर, कर्तृत्ववान, धर्मपरायण व कार्यक्षम राज्यकर्ती म्हणून अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात सुवर्णाक्षरांनी लिहिले गेले आहे. त्यांचा जन्म ३१ मे १७२५ रोजी चौंडी या छोट्याशा गावात (जिल्हा बीड) माणकोजी व सुशिलाबाई शिंदे या दांपत्यापोटी झाला. धनगर समाजात जन्मलेल्या अहिल्याबाईंचे लग्न वयाच्या आठव्या वर्षी सुभेदार मल्हारराव होळकर यांच्या मुलाशी, खंडेरावांशी झाले.

खंडेरावांच्या आईचे नाव गौतमीबाई होते; खंडेराव हे व्यसनी, छंदीफंदी होते. पण अहिल्याबाईंनी याबाबतीत तक्रार न करता सासऱ्यांनी नेमून दिलेल्या कामात लक्ष घातले. कुशाग्र बुद्धीची देणगी लाभलेल्या या सूनबाईंवर सासऱ्यांचा मोठा विश्वास होता आणि खूप महत्त्वाचा पत्रव्यवहार ते अहिल्याबाईंवरच सोपवीत असत. खंडेरावांपासून त्यांना दोन अपत्ये झाली. मालेराव हा मुलगा आणि मुक्ताबाई ही कन्या. अहिल्या-बाईंना वयाच्या अठ्ठाविसाव्या वर्षी वैधव्याला सामोरे जावे लागले.पती खंडेराव कुंभेरी येथे लढाईत मरण पावले. त्यावेळच्या प्रथेप्रमाणे त्या सती जायला निघाल्या. पण सासरे म्हणाले, प्रजाहितासाठी तरी तुम्ही सती जाऊ नये. हे राज्य सांभाळायचे आहे.

आपल्या सासऱ्यांच्या इच्छेचा अहिल्याबाई होळकरत्यांनी मान राखला आणि सती न जाता राज्यकारभारावर आपले लक्ष केंद्रित केले. मल्हारराव ज्यावेळी मोहिमेवर



## निमित्त

असत, तेव्हा स्वतः अहिल्याबाई राज्याचा बंदोबस्त चोख राखीत असत. मल्हाररावांच्या सल्ल्यानुसार वागत असत.

अहिल्याबाई होळकर हे नाव मराठ्यांच्या इतिहासात अमर झाले. त्याला त्यांची धर्मपरायण आणि उदारवृत्ती कारणीभूत ठरली. बाई काय राज्य कारभार करणार ही दरबारी मंडळींची अटकळ त्यांनी सपशेल खोटी ठरविली. अशी शंका घेणाऱ्यात त्यांचा जुना दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड उर्फ गंगोबा तात्या हा प्रमुख होता. राघोबादादांशी त्यांनी अहिल्याबाईंविरुद्ध संधान बांधले आणि इंदूर बळकावण्यासाठी त्यांना प्रोत्साहित केले.

अहिल्याबाई एक चाणाक्ष आणि सुधारणावादी राज्यकर्ती होत्या. त्यांनी प्रमुख तीर्थक्षेत्री विशेषतः अयोध्या, नाशिक, द्वारका, पुष्कर, हृषीकेश, जेजुरी, पंढरपूर, गया, उदेपूर, चौंढी येथे मंदिरे बांधली. यांशिवाय सोरटी सोमनाथ, ओंकारेश्वर,मल्लिकार्जुन, औंढानागनाथ, काशीविश्वेश्वर, विष्णुपाद, महाकाळेश्वर आदी मंदिरांचा जीर्णोद्धार केला.

अहिल्याबाईंचा ग्रंथसंग्रह मोठा व दुर्मीळ होता. त्यात निर्णयसिंधू, द्रोणपर्व, ज्ञानेश्वरी, मथुरा माहात्म्य, मुहूर्त चिंतामणी, वाल्मिकी रामायण, पद्मपुराण, श्रावणमास माहात्म्य इत्यादी ग्रंथांच्या हस्तलिखित प्रती होत्या. विद्वानांना त्यांच्या योग्यतेप्रमाणे मानसन्मान दिला जाई. अखेरच्या दिवसांत त्यांना दुःख आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. त्यांचे दोन भाऊ वारले. मुलीचा मुलगा नाथ्याबा ऐन तारुण्यात गेला (१७९०), तुकोजी होळकरांची सून आनंदीबाईचे देहावसान झाले. त्यानंतर जावई यशवंतराव फणसे अचानक गेले आणि मुक्ताबाई सती गेली. अशा बिकट परिस्थितीत शिंद्यांचा सरदार गोपाळराव याने १७९२ मध्ये होळकरांच्या फौजेवर हल्ला केला. तेव्हा तरुणासही लाजवील अशा तडफदारीने त्यांनी शिंद्यांचा पराभव केला. त्यांच्या राज्यात सुबत्ता, संपन्नता व शांती होती. त्या अजातशत्रू होत्या; पण राज्यावर गुदरलेल्या संकटांना त्यांनी चोख उत्तर दिले.

मध्यम उंचीची, सावळ्या वर्णाची, डोईवर पदर घेतलेली ही स्त्रीकर्तृत्व आणि विचार या दोन्ही दृष्टींनी केवढ्या उंचीची होती, हे त्यांचे आयुष्यच सांगते. महेश्वर येथे वृद्धापकाळाने त्यांचे १३ ऑगस्ट १७९५ रोजी निधन झाले.

**(साभार : विकासपीडिया)**


## बातमीतील बात




## आरोग्य प्रहर

# आंब्याच्या कोयीचेही आरोग्यदायी फायदे

उन्हाळ्याचा सीझन सुरू झाला की सर्वत्र बाजारपेठांमध्ये आंब्याचा घमघमाट पसलेला असतो. चवीला गोड तसेच रसाळ असणाऱ्या आंब्याला जगभरात प्रचंड मागणी आहे. पण आंब्याचा गर खाऊन लोक त्याची कोय फेकून देतात, परंतु आंबाचे शरीराला जितके फायदे आहेत, तितकिच त्याची कोयही गुणकारी मानली जाते.



आंब्याच्या कोयमध्ये अनेक नैसर्गिक घटक आढळतात. व्हिटॅमिन, मिनिरल्स तसेच अँटि-ऑक्सिडंट्स गुणांनी परिपूर्ण असणारी आंब्याची कोय शरीरासाठी फायदेशीर आहे.

**केसांतील कोंडा कमी होतो-** केसांमधील कोंडा ही एक मोठी समस्या आहे. फक्त हिवाळ्यातच नाही तर उन्हाळ्यात देखील केसांमध्ये कोंडा होण्याची समस्या उद्भवू शकते.

आंब्याच्या कोयीपासून बनवलेले पेस्ट केसातील कोंडा नाहिसा करण्यासाठी उपयुक्त ठरते. हे पेस्ट केसांवर तसेच टाळूवर हळूवारपणे लावावे. त्यानंतर काही वेळानंतर केस पाण्याने धुवावे. हे पेस्ट केसांना लावल्यामुळे केस मऊ आणि चमकदार बनतात.

१) सुरुवातीला आंब्याच्या काही कोय एकत्र करून घ्या.

२) या कोयींच्या वरचा भाग पूर्णपणे काढून त्याच्या आतील पांढरी बी काढा.

३) या बिया मिक्समध्ये बारीक करून घ्याव्या.

४) हे मिश्रण राईच्या तेलामध्ये एकजीव करावे आणि ही पेस्ट केसांवर अप्लाय करावी.

**कोलेस्ट्रोल कंट्रोल होण्यास मदत -** आंब्याच्या कोयीमुळे शरीरातील बॅड कोलोस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते. आंब्याच्या कर्नेल पावडरचे सेवन केल्याने खराब कोलेस्ट्रॉलची पातळी कमी होण्यास मदत होते आणि रक्तातील साखरेची पातळी देखील नियंत्रित राहते. या कोयीच्या पावडरपासून शरीरातील रक्ताभिसरण सुधारण्यास मदत होते, असे तज्ज्ञ सांगतात. यासाठी आंब्याची कोय नीट वाळवून बारीक करून त्याची बारीक पावडर बनवा. एक ग्लास पाण्यात एक चमचा पावडर मिसळून त्याचे सेवन करावे. त्यामुळे कोलेस्ट्रॉलची पातळी नियंत्रणात राहते.

**वजन होईल कमी-** वजन कमी करण्यासाठी आंब्याची कोय उपयुक्त ठरते. यामुळे मेटाबॉलिक रेटमध्ये वाढ होऊन, पोटावरील चरबी कमी होते.

# कळमजे परिसरातील ग्रामस्थांना गढूळ पाणी

माणगाव : बातमीदार , प्रतिनिधी



मुंबई-गोवा महामार्गावर माणगावजवळील कळमजे येथील पुलाचे बांधकाम अर्धवट अवस्थेत आहे. तेथील नदीपात्रात मातीच्या भरावामुळे तेथील पाच गावांतील लोकांना माती मिश्रीत गढूळ आणि दुषित पाणी प्यायला लागत आहे. त्यामुळे या गावकऱ्यांचे आरोग्य धोक्यात आले असून त्यांना छोट्या आणि मोठ्या आजारांचा सामना गेली पाच वर्षे करावा लागत आहे.

या समेस्येसह पावसाळ्यात पुराचे पाणी शेतकऱ्यांचा शेतात घुसून दरवर्षी भातशेतीचे अतोनात नुकसान होत आहे. मात्र नुकसान भरपाईची मागणी करुन सुद्धा शासनाने भरपाई अद्यापही दिलेली नाही. त्यामुळे तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

कळमजे पुलाचे काम अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. येथील गोद नदी पात्रात दहा फूट रुंद आणि आठ फुट उंची तसेच वीस फूट लांबीचा माती भराव करण्यात आला आहे. मात्र तो भराव पावसाळ्यात नदीपात्रातच ठेवला जातो. त्यामुळे पावसाळ्यात तो भराव वाहून शेतीत घुसून दरवर्षी भातशेतीचे प्रचंड नुकसान होत आहे. याकडे दुर्लक्ष केले जात आहे असा आरोप केला जात आहे.

उन्हाळ्यात गोद नदी पात्रात कालव्याचे पाणी सोडण्यात येते. त्यामुळे कळमजे, खरवली फाटा, सालेगाव, मांगवली आणि बामणोली या पाच गावांतील लोकांना दुषित आणि गढूळ पाणी पुरवठा होतो. या पाच गावांची मिळून बामणोली ग्रामपंचायत आहे. याबाबत तक्रारी करुनसुद्धा दुर्लक्ष केले जात आहे.

कळमजे येथील ग्रामस्थ वसंत वाढवळ यांची १० गुंठे जमीन नवीन पुल बांधण्यासाठी शासनाने घेतली. त्याचा अर्थिक मोबदला अद्यापही देण्यात आलेला नाही. याबाबत प्रांताधिकारी कार्यालयात दररोज उडवाउडवीची उत्तरे दिली जातात. त्यानंतर वसंत वाढवळ यांनी खासदार सुनील तटकरे यांच्या कडे तक्रार केली. त्यांनी १४ मे २०२५ रोजी माणगाव प्रांताधिकारी यांना तत्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले, परंतु अद्यापही कारवाई झाली नाही.

# श्रीवर्धन जीवना बंदर 'आपला दवाखाना'मध्ये डॉक्टरच नाही!

श्रीवर्धन : प्रतिनिधी

श्रीवर्धन तालुक्यातील जीवना कोळीवाडा येथे सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासनामार्फत सुरू करण्यात आलेल्या हिंदू हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सध्या वैद्यकीय अधिकाऱ्याशिवाय चालवला जात आहे. आक्टोबर २०२३ मध्ये एका भाड्याच्या खोलीत मोठ्या थाटात उद्घाटन झालेल्या या दवाखान्यात डॉक्टर नसल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे.

दवाखाना सुरू होतानाच एका वर्षाच्या कंत्राटावर वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, मे २०२४ मध्ये कंत्राट संपल्यानंतर संबंधित डॉक्टरने इतर ठिकाणी हजर राहिल्याने येथे रिक्त पद भरले गेलेले नाही. परिणामी, सध्या या दवाखान्यात केवळ एक परिचारिका आणि मदतनीस काम पाहत असून, रुग्ण सेवा पूर्णपणे खंडित झाली आहे.




विशेष म्हणजे, परिसरात पावसाळा सुरू झाल्याने ताप, सर्दी, मलेरिया, डेंग्यू यांसारख्या आजारांनी डोके वर काढले आहे. दिवसेंदिवस रुग्णसंख्या वाढत असून, जीवना कोळीवाडा परिसरातील स्थानिक नागरिक आणि नौकावर्गातील मजुरांना उपचारासाठी श्रीवर्धन शहरातील मुख्य रुग्णालयात जावे लागत आहे. यामुळे वेळेचा अपव्यय तर होतोच, शिवाय आर्थिक भारही वाढतो.

आरोग्य विभागाच्या आपला दवाखाना योजनेचा उद्देशच म्हणजे प्राथमिक स्तरावर विनामूल्य व मोफत आरोग्य सेवा देणे. मात्र डॉक्टर नसल्यामुळे या योजनेच्या हेतूलाच हरताळ फासला जात आहे. सदर दवाखान्यात औषधसाठा सुद्धा नाही, हे दुर्दैव आहे.स्थानीक नागरिकांनी लवकरात लवकर नवीन वैद्यकीय अधिकारी नेमण्याची मागणी आरोग्य विभागाकडे केली आहे.

**जीवना कोळीवाडा येथील आपला दवाखाना मध्ये लवकर डॉक्टरची नियुक्ती होईल.अलिबाग येथील जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालयात या बाबतीत प्रस्ताव पाठवला आहे.**

**-डॉ.संतोष नारायणकर.**
तालुका आरोग्य अधिकारी.

## जिल्हाधिकाऱ्यांकडून जड वाहतूक बंदीचा आदेश


अलिबाग : रामप्रहर वृत्त

गेल (गॅस अथॉरिटी ऑफ इंडिया लिमिटेड) उसर, ता. अलिबाग येथे मोठ्या आकाराच्या मशिनरीच्या वाहतुकीसाठी रायगड जिल्हाधिकारी यांनी काही मार्गांवरील सर्वसामान्य वाहतुकीवर तात्पुरती बंदी घालण्याचा आदेश जारी केला आहे.

पोलीस अधीक्षक, रायगड -अलिबाग यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रानुसार, कल्याण- तळोजा- कळंबोली- पेण- नागोठणे- पेझारी -अलिबाग- कुरूळ- उसर या मार्गावरून केली जाणार आहे.

वाहतूक अधिक प्रभावीपणे पार पडावी आणि नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होऊ नये यासाठी दि. ३० मे रोजी मध्यरात्री १२:०१ वाजल्यापासून सकाळी ६:०० वाजेपर्यंत ही वाहतूक बंद करण्यात येणार आहे.

# संचमान्यतेपूर्वीच शिक्षकांच्या बदल्यांचा घाट; प्राथमिक शिक्षकांसमोर अडचणींचा डोंगर



अलिबाग : प्रतिनिधी

शाळा सुरू होण्याची घटिका भरत आली तरी अद्याप प्राथमिक शिक्षकांच्या बदल्यांबाबतचा निर्णय अधांतरीच आहे. राज्य शासनाच्या सुधारीत संचमान्यता धोरणाला राज्यातील प्राथमिक शिक्षकांचा विरोध असताना आता राज्य सरकारने अनाकलनीय भुमिका घेतली आहे. संच मान्यता निश्चित करण्यापूर्वीच शिक्षकांच्या बदल्यांचा घाट घालण्यात आला आहे. संच मान्यतेपूर्वीच बदल्या झाल्या तर शिक्षकांना पुन्हा बदल्यांना सामोरे जावे लागणार आहे.

राज्य सरकारचा शालेय शिक्षण विभाग आणि ग्रामविकास विभागात समन्वय नसल्याचे दिसून येत आहे. याचा फटका शिक्षकांना बसणार आहे. जर आता एखाद्या शिक्षकाची विशिष्ट शाळेवर बदली झाली आणि नंतर होणारया संचमान्यतेत तो शिक्षक संबंधित शाळेवर अतिरिक्त ठरला तर त्याची पुन्हा बदली होईल. यामध्ये त्या शिक्षकासह त्याच्या कुटुंबाची ससेहोलपट होणार असल्याचे शिक्षकांचे म्हणणे आहे.

### ◆ ...तर शिक्षक अतिरिक्त ठरतील

उच्च प्राथमिक शाळेत वर्ग सहा ते आठ तिन्ही वर्ग असतील तर तीन शिक्षक मान्य होण्यासाठी ७८ पटसंख्या असणे आवश्यक आहे या अगोदरची ६१ पटसंख्या असल्यास तीन तीन शिक्षक मान्य होत होते ज्या शाळेत वर्ग सहावी ते सातवी किंवा सहावी ते आठवी असे एकूण २० पेक्षा कमी विद्यार्थी तेथे एक शिक्षक मान्य करण्यात आले आहेत त्यामुळे अशा शाळांमधील विद्यार्थ्यांना दाखले घेऊन दुसऱ्या शाळेमध्ये जावे लागण्याची शक्यता आहे.

शिक्षक संच मान्यता हा विषय शालेय शिक्षण विभागाकडे येतो तर शिक्षकांच्या बदल्यांचा विषय ग्रामविकास विभागाकडे येतो. दोन्ही विभागांमध्ये समन्वय नसल्याने ही समस्या उदभवली आहे. मुळातच मे महिन्यात शिक्षकांच्या बदल्या होणे अपेक्षित होते परंतु संचमान्यतेअभावी अद्याप बदल्या रखडल्या आहेत. शाळा सुरू व्हायला अवघे काही दिवस उरले आहेत अशावेळी बदलीपात्र शिक्षकांच्या पाल्यांचे शाळेतील प्रवेश देखील रखडले आहेत. आपल्या पाल्याला एखाद्या शाळेत प्रवेश घेतला आणि बदली दुसरीकडे झाली तर काय करायचे असा प्रश्न शिक्षकांना सतावतो आहे.

१५ मार्च २०२४ च्या शासन निर्णयानुसार झालेल्या बदलाच्या अनुषंगाने कार्यवाही झाली तर एखाद्या शाळेत इयता सहावी ते आठवीचे वर्ग मिळून २० पेक्षा कमी पटसंख्या असेल तर एकही शिक्षक मान्य होत नाही. परिणामी अनेक पदवीधर शिक्षक रिक्त ठरण्याची भीती शिक्षक संघटनांनी व्यक्त केली आहे तसेच पूर्वी विद्यार्थी संख्येनुसार शिक्षकसंख्या निर्धारित होती नव्या निकषानुसार विद्यार्थी संख्या वाढवण्यात आली आहे परिणामी अनेक शाळांना अपेक्षेपेक्षा कमी शिक्षक उपलब्ध होणार आहेत.

**ग्रामीण भागातील कमी पटाच्या शाळा बंद करण्याचा घाट शासनाने घातला आहे. या नवीन संच मान्यतेमुळे त्याला अधिक पुष्टी मिळते आहे. या धोरणामुळे गोरगरीब विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होणार आहे. महत्त्वाचे म्हणजे आधी जुन्या पद्धतीनुसार संचमान्यता निश्चित करावी. नंतरच बदली प्रक्रियेला सुरूवात करावी; अन्यथा त्याचा त्रास शिक्षकांना होईल.**

**-राजेश सुर्वे, राज्याध्यक्ष महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषद, प्राथमिक विभाग**

# वीज पडून मृत्यू झालेल्या युवकाच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान



**कर्जत :** २६ मे रोजी कर्जत तालुक्यातील नेरळ नजिकच्या बिरदोले गावातील २५ वर्षीय युवा शेतकरी रोशन कचरू कालेकर याचा वीज पडून मृत्यू झाला होता. त्याच्या कुटुंबियांना सानुग्रह अनुदान म्हणून चार लाख रुपये देण्यात आले. केंद्र शासनाच्या नैसर्गिक आपत्ती निकषानुसार नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तीला सानुग्रह अनुदान दिले जाते. २६ मे रोजी वीजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडत असताना रोशन पावसाने आपल्या शेतीचे काही नुकसान झाले आहे काय? ते पाहण्यासाठी शेतावर गेला असता त्याच्या अंगावर वीज पडून त्याचा मृत्यू झाला. त्याच्या कुटुंबियांना हे सानुग्रह अनुदान देण्यात आले.


सिडको
शहरांचे शिल्पकार

## जाहीर सूचना

सिडको महामंडळाच्या भूमी व भूमापन विभागातर्फे साडेबारा टक्के योजनेंतर्गत खालील तपशीलानुसार संबंधित भूधारकांना भूखंडाचे वाटप करण्याची प्रशासकीय कार्यवाही करण्यात येत असून,खालील तपशीलानुसार संबंधितांना भूखंडाचे **करारनामा / वाटपपत्र** प्रस्तावित आहे.

| अ.क्र. | नोड व संचिका क्र. | गाव व निवाडा क्र. | सर्व्हे क्र./हि.क्र. | संपादित क्षेत्र (हे.आर.) | मंजूर पात्रता | करारनामा करण्यात येणाऱ्या भूखंडाची माहिती | करारनामा संबंधित भूधारक व त्यांचे कायदेशीर वारसांची माहिती | संचिकेतील उपलब्ध माहिती व सद्यःस्थितीनुसार संपादित जमिनीशी संबंधित न्यायालयीन दाव्यांची माहिती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | **ता. पनवेल, जि. रायगड** | | | | |
| १ | उलवे १५११ | वहाळ ५३१ | ५०९/५ | ०-०५-० | २५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.२२९, सेक्टर-१९, क्षेत्र-२४०.५५ चौ.मी. | कै. सुंदराबाई बाळू पारींगे (मयत) व कै. बारसुबाई वाळक्या पारींगे (मयत) यांचे हक्कसोड पत्रान्वये वारस<br>१) श्री. बामजी वाळक्या पारींगे व<br>२) श्री. रामचंद्र वाळक्या पारींगे | मुळ भूधारक श्री. हसुराम बाळू पाटील यांनी सह दुय्यम निबंधक, पनवेल-१ यांच्याकडे दिनांक १७/०७/२००८ रोजी दस्तऐवजाचा अनुक्रमांक पवल१-०५५२४/२०२४ अन्वये हक्कसोड पत्र नोंदणीकृत करून प्रस्तावित मौजे वहाळ निवाडा क्र.५३०, सर्व्हे नं./हिस्सा नं. १६/१, क्षेत्र-०-१५-० हे. आर. या जमिनीपोटी १२.५% योजनेनुसार मिळणाऱ्या भूखंडाचे लाभ १. श्रीमती बारसुबाई वाळक्या पारिंगे, २. श्री. बामजी वाळक्या पारिंगे, ३.श्री. रामचंद्र वाळक्या पारिंगे यांच्या लाभात हस्तांतरीत केले आहेत. |
| | | वहाळ ५३० | १६/१ | ०-१५-० | | | | |
| | | वहाळ ५३०B | २८३/९ | ०-०८-० | | | | |
| २ | तळोजा ४४५ | पडघे ९८ | ५३/० | ०-७३-० | ६०० चौ.मी. पैकी १०० चौ.मी. | भूखंड क्र.१४, सेक्टर-१७, क्षेत्र-९९.९९ चौ.मी. | बबीबाई बाबु पाटील | - |
| | | | एकूण क्षेत्र | ०-७३-० | | | | |
| ३ | करंजाडे | ३१७ब | १०८/४<br>१२२ब/२ | ०-०९-४<br>०-०६-१ | १५० चौ.मी. | करंजाडे, भूखंड क्र. १६७/५, सेक्टर-४, क्षेत्र-१४९.९५ चौ.मी. | सादर केलेल्या हक्कसोडप्रमाणे **१) कै. महादु उर्फ महादेव सुक्या उर्फ सुकूर कोळी उर्फ भोईर (मयत) यांचे वारस** १.१) श्री. शंकर महादु उर्फ महादेव कोळी उर्फ भोईर,<br>**२) कै. हरिश्चंद्र सुक्या उर्फ सुकूर कोळी उर्फ भोईर (मयत) यांचे वारस** २.१) श्री. एकनाथ हरिश्चंद्र कोळी उर्फ भोईर **३) कै. शांताबाई महादेव पाटील (मयत) यांचे वारस** ३.१) श्री. विलास दत्ता पाटील ४) मथुराबाई अनंत भोईर | निरंक |
| | | | | **नोड- द्रोणागीरी** | | | | |
| ४ | नवघर ९२१ | २९२/८६ | ३१०/१<br>३१८/४<br>३२२/५<br>३४१/१ | ०-११-४<br>०-१४-४<br>०-१६-०<br>०-१७-९ | १-३९-१ एकूण पात्रता १२१७.१२ चौ.मी. पुर्णांकात १२०० चौ.मी. | द्रोणागीरी सेक्टर-२७ मधील भूखंड क्र.९, क्षेत्र-१२०० चौ. मी. | **कै. श्री. पांडुरंग चाया पाटील (मयत)** दि. ०७.०७.१९९३ तसेच पहिली पत्नी **कै. बेबीबाई पांडुरंग पाटील (मयत)** दि. ०९.०४.२००५ यांचा मुलगा **कै. भास्कर पांडुरंग पाटील** (मयत) दि. ११.०९.२००० **कै. श्री. पांडुरंग चाया पाटील (मयत)** यांची दुसरी पत्नी **कै. कृष्णाबाई पांडुरंग पाटील (मयत)** दि. ९.०७.१९८० दिवाणी चौ.अर्जानुसार त्यांचे वारस **१) कै. भास्कर पांडुरंग पाटील (मयत) यांचे वारस** १:१ श्रीमती विजया भास्कर पाटील १:२ श्री. वैभव भास्कर पाटील १:३ सौ. अश्विनी हरिश्चंद्र भोईर **२) कै. कृष्णाबाई पांडुरंग पाटील (मयत) यांचे वारस** २:१ श्री. भरत पांडूरंग पाटील २:२ सौ.जयश्री गजानन पाटील २:३ सौ. नंदा यशवंत भोईर २:४ सौ.जयश्री यशवंत पाटील २:५ सौ. कमळा दत्तात्रेय जोशी | वाटपित भूखंडावर एस. सी. एस. क्र. ३७९/२०११ हा दावा असून, सदर दावा मा. कोर्टात प्रलंबित असून पुढील तारीख १९/०६/२०२५ रोजीची आहे. |
| | पागोटे ९२१ | २८४/८६ | ८१/१०<br>९७/४+५/अ-१<br>९१/७A<br>१०३/१०<br>१०५/९<br>१०६/५A<br>१०७/६A<br>१०८/१०<br>११५/१<br>१३१/१ | ०-०५-६<br>०-००-२<br>०-०१-५<br>०-१३-०<br>०-७-६<br>०-०१-०<br>०-१३-५<br>०-०६-८<br>०-१३-७<br>०-१०-१ | | | | |
| | नवघर ९२१ | २९५/८६ | १६५/९ | ०-०६-४ | | | | |
| ५ | उलवे ५८ | गव्हाण ८ | ७१/४ | ०-०५-६ | ५५५० चौ.मी. | उलवे नोड येथील भूखंड क्र.३१, सेक्टर-९, क्षेत्र-५५४९.९४ चौ.मी. | मुळ भुधारक कै. बाळाराम धर्मा ठाकूर (मयत) यांचे नोंदणीकृत मृत्युपत्रा नुसार वारस<br>१) श्री. अरुण बाळाराम ठाकूर,<br>२) श्री. भरत बाळाराम ठाकूर,<br>३) श्री. भगवान बाळाराम ठाकूर,<br>४) श्री. अभिमन्यू बाळाराम ठाकूर,<br>५) श्रीमती जयश्री यशवंत तांडेल,<br>७) श्रीमती मिनाक्षी मोरेश्वर म्हात्रे,<br>८) श्रीमती बेबीबाई कृष्णा पाटील,<br>९) कै. इंदूमती अंबाजी घरत (मयत) यांचे वारस<br>९.१) श्री. प्रदिप अंबाजी घरत,<br>९.२) कु. कामिनी अंबाजी घरत,<br>९.३) श्रीमती कांचन विनोद पाटील, ९.४) श्रीमती सलोनी राजेश पाटील, ९.५) श्रीमती श्रावणी राजेश पाटील ९.६) कु. श्रीवेद राजेश पाटील | स्पे.मु.क्र. २६८/२०१०<br>स्पे.मु.क्र. ७३१/२०११<br>रे.मु.क्र. ३७३/२०१४ |
| | | गव्हाण ४८२ | २२५/५ | ०-३०-० | | | | |
| | | गव्हाण ४८२ | २२५/१०<br>२२३/४<br>२११/४ | १-०२-०<br>०-४३-०<br>०-९-९ | | | | |
| | | गव्हाण ८ | २१०/२<br>२१७/१D<br>२२०/४K<br>२२२/५<br>२१२/२<br>२१२/३<br>२११/२<br>२२५/९<br>२२५/७<br>२२२/७ | ०-०६-१<br>०-०६-३<br>०-२२-३<br>०-१९-३<br>०-१७-६<br>०-१६-१<br>०-६०-२<br>०-९-०<br>०-९-०<br>०-१८-० | | | | |
| | | गव्हाण ४८२ | ४०३/० | ०-३७-० | | | | |
| | | गव्हाण ३२६ | १६१/४ +७A | ०-०७-८ | | | | |
| | | गव्हाण १५४ | २२२/८A +८C | ०-०६-३ | | | | |
| | | गव्हाण ४७४ | ११९/१<br>१२०/६ +८+९ | ०-६१-७<br>१-३१-६ | | | | |
| | | गव्हाण ३६५ | २३९/३ | ०-१३-४ | | | | |
| | | गव्हाण ४७४ | १२०/१ | ०-१०-६ | | | | |
| ६ | तळोजा २७४ | पेंधर १७२ | २२७/४ब<br>२३२/२ +३अ(२) | १-४८-०<br>०-५२-२ | १७५० चौ.मी. | भूखंड क्र.२, सेक्टर-२०, क्षेत्र-१७५० चौ.मी. | श्री. गोसावी महादु पाटील | - |
| | | | एकूण क्षेत्र | २-०-० | | | | |

उपरोक्त नमूद केलेल्या संचिकेसंदर्भात संबंधितांनी नोंद घ्यावी की, संबंधित संचिकेबाबत न्यायालयात त्यांचे हक्क प्रस्थापित करणारा दावा/हरकती प्रलंबित आहे, तसेच भूधारकांच्या नावाचा अथवा त्यांच्या कायदेशीर वारसांच्या नावाचा जाहीर सूचनेप्रमाणे प्रसिद्ध झालेल्या मजकुरात समावेश झालेला नसेल, अशा संबंधितांनी सदर जाहीर सूचना प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरूपात अर्ज सादर करण्याच्या ठिकाणी अर्ज व पूरक कागदपत्रासह निदर्शनास आणावी. सदर अर्जासह पूरक कागदपत्रांची तपासणी करून वाटपपत्र करून देण्याबाबत पुढील योग्य कार्यवाही करण्यात येणार असून, अपूर्ण माहितीसह कागदपत्रांच्या अर्जाची दखल घेण्यात येणार नाही, याची संबंधितांनी नोंद घ्यावी, ही विनंती.

**अर्ज सादर करण्याचे ठिकाण :- मुख्य भूमी व भूमापन अधिकारी**
सिडको भवन, तळ मजला,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.

**अति. मुख्य भूमी व भूमापन अधिकारी (पनवेल)**

CIN - U99999 MH 1970 SGC-014574
www.cidco.maharashtra.gov.in
सिडको/जनसंपर्क/०९६/२०२५-२६

# ‘लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला तत्काळ द्यावे’

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला देण्यासंदर्भातला प्रश्न केंद्र शासनाकडे प्रलंबित असल्याने प्रकल्पग्रस्तांमध्ये असंतोष पसरला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासोबत येत्या १५ दिवसांत बैठक आयोजित केली जाईल. राज्य शासनाने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत तातडीने लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक आयोजित करुन नाव जाहीर करावे तसेच नोटिफिकेशन जारी करावे, अशी मागणी कृती समितीच्या वतीने अध्यक्ष, ज्येष्ठ नेते दशरथ पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत केली आहे.



लोकनेते दि. बा. पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ सर्वपक्षीय कृती समितीच्या वतीने अध्यक्ष दशरथ पाटील यांच्या अध्यक्षतेखाली लोकनेते दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव देणे तसेच इतर प्रश्नांबाबत विचारविनिमय करण्यासाठी शासकीय विश्रामगृह येथे ठाणे जिल्ह्यातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते. त्यानंतर आयोजित पत्रकार परिषदेत दशरथ पाटील बोलत होते.

बैठकीला माजी मंत्री जगन्नाथ पाटील, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, जे. डी. तांडेल, संतोष केणे, गुलाब वझे, नितीन पाटील, डॉ. यशवंत सोरे, शरद म्हात्रे, वासुदेव भोईर, दीपक पाटील, दीपक म्हात्रे, सीमा घरत, संजय घरत, संतोष घरत, धीरज कालेकर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

लोकनेते दि.बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला द्यावे यासाठी आजवर अनेक आंदोलने केली. त्यामुळे राज्य सरकारने त्यांच्या नावाचा ठराव महाराष्ट्र विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात मंजूर करून तो केंद्र सरकारकडे पाठविला आहे, परंतु हा ठराव केंद्रात प्रलंबित आहे. विमानतळाचे काम आता पूर्णत्वास आले आहे. कदाचित नोव्हेंबरपासून उड्डाणाला सुरुवात होईल. अशावेळी ‘दिबां’चे नाव या विमानतळाला देणे गरजेचे आहे, असे दशरथ पाटील म्हणाले.

केंद्र सरकारच्या हवाई वाहतूक मंत्र्यांबरोबर बैठक घेऊन कृती समितीच्या वतीने या प्रश्नाचा पाठपुरावा केला आहे. तरीही आजपर्यंत हा प्रश्न केंद्रात प्रलंबित असल्याने केंद्राने हा प्रश्न त्वरित सोडवावा, असे दशरथ पाटील म्हणाले.

विमानतळ परिसरात नोकऱ्यांचा प्रश्न कसा सोडवायचा, त्यात प्रकल्पग्रस्तांना व ठाणे, रायगड, पालघर, मुंबई येथील भुमिपूत्रांना प्राधान्य देऊन नोकरभरती करण्यासाठीही प्राधान्य देणे गरजेचे असल्याचे दशरथ पाटील म्हणाले.

### ‘दिबां’च्या स्मृतीदिनी कार्यक्रमाचे नियोजन

लोकनेते दि. बा. पाटील यांचा स्मृतीदिन २४ जून २०२५ रोजी आहे. या दिवशी काही भव्य कार्यक्रम आखता येईल का? यावर बैठकीत विचारविनिमय करण्यात आला. यासाठी वेगवेगळ्या भागात त्या त्या भागातील कार्यकर्त्यांनी लोकजागृती करत बैठका घ्याव्यात आणि कार्यक्रम यशस्वी करावा, असे सांगण्यात आले.

# रेल्वे फलाटावरील रूळ ओलांडून प्रवाशी घालतात जीव धोक्यात

**नवी मुंबई : प्रतिनिधी**

प्रवाशांनी रेल्वे रूळ ओलांडू नये यासाठी रेल्वे प्रशासनाने फलाटाच्या दोन्ही बाजूला असलेले रॅम्प तोडून त्या ठिकाणी लोखंडी रेलिंग बसविले आहेत तर काही ठिकाणी भिंतीदेखील बांधल्या आहेत, मात्र असे असतानाही प्रवाशांकडून रेलिंग ओलांडून रुळावरून प्रवास सुरूच असल्याचे निदर्शनास आले आहे तर काही प्रवाशी शॉर्टकटचा मार्ग म्हणून चक्क फलाटावरून उतरून रेल्वे रूळ ओलांडून जात असल्याचे दिसत आहे.



प्रवाशांची रेल्वे रूळ ओलांडून फलाटावर जाण्याची सवय मोडावी तसेच त्यांनी रेल्वे स्थानकातील पादचारी पुलाचा वापर करावा, यासाठी रेल्वे प्रशासनाकडून सर्वतोपरी सुविधा दिल्या जात आहेत. रेल्वेने प्रवाशांच्या सुरक्षेसाठी हार्बर रेल्वे मार्गावरील दिघा ते पनवेल व वाशी ते बेलापूर रेल्वे स्थानकाच्या दोन्ही टोकाला असलेले रॅम्प तोडून त्याजागी लोखंडी रेलिंग बसवले आहेत तर काही ठिकाणी भिंती बांधल्या आहेत. वेळ वाचवण्याच्या नादात अनेक प्रवासी जीव धोक्यात घालत रेल्वे रूळ ओलांडत असल्याचे निदर्शनास आले आहे.

विशेष म्हणजे, रेलिंग ओलांडून ये-जा करणाऱ्या प्रवाशांना रोखण्यासाठी रेल्वे प्रशासनाने अनेक उपाययोजना केल्या, मात्र प्रवाशी वर्गाकडून केराची टोपली दाखवली जाते. हार्बर आणि ट्रान्स हार्बर मार्गावर आता प्रवाश्यांची संख्या वाढू लागली आहे, मात्र या मार्गावरील सर्वच रेल्वे स्थानक प्रशस्त असून रेल्वेच्या दोन्ही दिशेला चढण्या उतरण्याची सोय आहे. शिवाय स्थानकातून बाहेर पडण्यासाठीही प्रशस्त मार्ग आहेत. त्यामुळे या स्थानकात आत्तापर्यंत गर्दीचे चित्र पाहायला मिळालेले नाही, मात्र या स्थानकानामध्ये रेल्वे रूळ ओलांडून स्थानकात प्रवेश करणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. यामुळे अपघाताचा धोका वाढतो.

रेल्वे रूळ ओलांडताना प्रवासी आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करत त्यांचे समुपदेशन करण्याचे काम रेल्वे पोलिसांद्वारे करण्यात येते. रस्ते सुरक्षा सप्ताहदरम्यानदेखील अशा प्रवाशांना रेल्वे प्रशासनाकडून गुलाब देऊन त्यांचे समुपदेशन केले जाते, मात्र कारवाईनंतर पुन्हा प्रवाशांकडून रेल्वे रूळ ओलांडून शॉर्टकट मारण्याचे प्रकार सुरू आहेत. अशातच रेल्वे स्थानकात आरपीएफ, जीआरपी, एमएसएफ जवान असे फक्त ३ ते ४ कर्मचारी असतात. अपुऱ्या मनुष्यबळात सर्व ठिकाणी लक्ष देणे त्रासदायक आणि आव्हानात्मक असल्याचे रेल्वे पोलिस कर्मचाऱ्यांचे म्हणणे आहे.

# उरण तालुक्यातील पदाधिकारी, कार्यकर्त्यांचा राष्ट्रवादीत प्रवेश




**उरण : वार्ताहर, बातमीदार**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात काम करणाऱ्या अनेक पदाधिकाऱ्यांनी गुरुवारी (दि. २९) राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांची भेट घेत मुख्यमंत्री अजित पवार यांच्या पक्षात प्रवेश केला.

यामध्ये तालुकाध्यक्षपदाची धुरा सांभाळलेले मनोज भगत, माजी कार्याध्यक्ष रमण कासकर, प्रवक्ते अजित पाटील, भेंडखळ ग्रामपंचायतीचे विद्यमान सदस्य लीलेश्वर भगत, तत्कालीन तालुका सरचिटणीस भूषण ठाकूर, उरण विधानसभा सरचिटणीस निलेश पाटील, तत्कालीन उरण तालुका ओबीसी सेल तालुकाध्यक्ष मच्छिंद्र ठाकूर, तालुका सरचिटणीस नामदेव मढवी, जासई विभाग अध्यक्ष दीपक पाटील, संतोष ठाकूर, गायकवाड आदी कार्यकर्त्यांनी या वेळी प्रदेश कार्यालयात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे यांच्या हस्ते घड्याळाचे चिन्ह असलेले उपरणे परिधान करीत जाहीर पक्ष प्रवेश केला.

प्रदेश कार्यालयात झालेल्या या छोटेखानी कार्यक्रमात उरणचे सर्व जुने कार्यकर्ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या मुख्य प्रवाहात आल्याचे समाधान व्यक्त करतानाच या नव्याने पक्षात आलेल्या सर्व कार्यकर्त्यांचा योग्य तो सन्मान राखण्याबरोबरच उरण तालुक्यावर यापुढील काळात अधिकाधिक लक्ष देण्याचे अभिवचन प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिले.

# मयत व्यक्तीच्या नातेवाईकांचा शोध

**पनवेल : वार्ताहर**

अपघाती घटनांत मृत पावलेल्या दोघा व्यक्तींच्या नातेवाईकांचा पनवेल रेल्वे पोलिस शोध घेत आहेत. यात गतवर्षी १५ नोव्हेंबर रोजी मृत पावलेल्या तरूणाची अद्यापही ओळख पटू शकली नाही. त्यामुळे सदर मृत व्यक्तींच्या नातेवाईकांबाबत कोणाला माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलिसांशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

पहिल्या घटनेत, सफाई कामगार यांनी कळविलेल्या माहितीनुसार खारघर रेल्वे स्टेशन फलाट क्रं १ वरील सीएसएमटी बाजूचे टोकाकडे अज्ञात लोकल गाडीची ठोकर लागून गाडीखाली सापडून एक तरूण गंभीर जखमी झाला होता. त्याचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. मृत तरूणाची उंची ५ फुट ५ इंच इतकी असून अंगाने सडपातळ, रंग सावळा असलेल्या या तरूणाचे ओळख चिन्ह म्हणून उजव्या खुब्याचे बाजूस जुने ऑपरेशन झालेले निशाण आहे. सदर मृताच्या नातेवाईकांबाबत कुणाला माहिती असल्यास पोलीस उपनिरीक्षक एस.पी.भोसले (९८२३०८०२९२) येथे अथवा स.पो.उप.नि श्रीकृष्ण वेदपाठक यांचा (९८७०१५७८५०) येथे संपर्क साधावा.

दुसऱ्या घटनेत, बेलापूर रेल्वे स्टेशन फलाट क्रं ०३ चे रेल्वे लाईनवर ४५ वर्षीय हिंदू व्यक्ती जबर जखमी अवस्थेत पोलिसांना मिळून आला होता. उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला आहे. त्याची उंची ५ फुट ५ इंच आहे. वारसांबाबत कोणाला माहिती असल्यास उपनिरीक्षक माने (९८७०२६८३९७) व स.पो.उप.नि वेदपाठक (९८७०१५७८५०) येथे संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.



**पनवेल : कुडाळदेशकर आद्य गौडब्राम्हण समाज मंडळातर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन ७ जून रोजी ओरायन मॉल येथे करण्यात आले आहे. या शिबिराचे निमंत्रण माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना देण्यात आले. या वेळी यतीन ठाकूर, भाऊ सामंत, विनायक तिरोडकर उपस्थित होते.**



**पनवेल : भाजप युवा मोर्चा तालुका उत्तर मंडळ अध्यक्षपदी आशिष कडू यांची नियुक्ती झाली आहे. याबद्दल त्यांचे भाजप नेते अरुणशेठ भगत यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. या वेळी शिवकरचे सरपंच आनंद ढवळे, शुभ पाटील, भूषण जळे, सुमित मिश्रा आदी उपस्थित होते.**

# पनवेल महापालिकेचा आपत्ती प्रतिसाद दल स्थापन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका कायक्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर आयुक्त मंगेश चितळे यांनी पनवेल महानगरपालिकेत आपत्ती प्रतिसाद दल स्थापन केले असून या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या माध्यमातून आपत्कालीन प्रसंगामध्ये प्रतिबंधात्मक कार्य करण्याचे आदेश दिले आहेत.

राष्ट्रीय आपत्ती व्यवस्थापन कायदा, २००५ मधील तरतूदी, राष्ट्रीय आपत्ती प्राधिकरण व संचालक, आपत्ती व्यवस्थापन, आपत्ती कक्ष यांच्या सुचना विचारात घेऊन, आयुक्तांनी डी.आर.एफ.(टारगेट रिस्पॉन्स फोर्स) च्या धर्तीवर अग्निशमन दल आणि नागरी संरक्षण दलातील प्रशिक्षीत कर्मचाऱ्यांना घेऊन आपत्ती प्रतिसाद दल (डी. आर. एफ) तयार करण्याबाबत आदेशित केले आहे. या आदेशानूसार अग्निशमन दलाला लाईफ जॅकेट, राफ्ट इत्यादींनी सुसज्य राखण्यास सांगितले आहे.

पनवेल शहराकरीता डी. आर.एफची निर्मीतीमध्ये, मुख्य अग्निशमन अधिकारी प्रविण बोडखे यांची नियंत्रणाखाली अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती करण्यात आली आहेत.

नियंत्रण अधिकाऱ्याच्या अंतर्गत या आपत्ती प्रतिसाद दलाचे दोन युनिट करण्यात आले आहे. यामध्ये पहिल्या युनिटमध्ये अग्निशमन अधिकारी हरिदास सुर्यवंशी यांच्या अधिपत्याखाली ११ अग्निशमकांची टिम तयार करण्यात आली आहे. तसेच अग्निशमन अधिकारी संदिप पाटील यांच्या अधिपत्याखाली ११ अग्निशमकांची दुसरी टिम तयार करण्यात आली आहे.

आयुक्त, पनवेल महानगरपालिका सन २०२५ च्या मान्सून पूर्व तयारी अंतर्गत करावयाच्या कार्यवाहीसाठी करण्यासाठी महापालिकेच्या अधिकारी व विविध विभाग प्रमुखांचा आपत्ती व्यवस्थापन कक्ष स्थापन करण्यात आल्याची माहिती परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे यांनी दिली आहे.या आपत्ती व्यवस्थापन कक्षाच्या माध्यमातून आपत्कालीन प्रसंगामध्ये प्रतिबंधात्मक कार्य, सौम्यीकरण उपाय योजना, तात्काळ प्रतिसाद, मदत व पुनर्वसन, समन्वय इत्यादी कार्य करण्यात येणार आहे.

पनवेल महानगरपालिका अंतर्गत सध्या अस्तित्वात असलेल्या प्रभागांमधील नागरिकांना अधिक प्रभावीपणे प्रभागस्तरीय सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी आयुक्तांनी परिमंडळाची निर्मिती करण्यात आली आहे. प्रभाग स्तरावरील चालणा-या दैनंदिन कामकाजात गतीमानता, प्रभाग स्तरीय सोई सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी तसेच प्रभाग स्तरावरील चालणाऱ्या दैनंदिन कामकाजात गतीमानता आणण्यासाठी परीमंडळ उपायुक्त यांच्या प्रमुख नियंत्रणाखाली दोन परीमंडळे स्थापित करण्यात आली आहेत.

**नेमुन दिलेले अधिकारी**

१. खारघर - कळंबोली- नावडे परीमंडळ (१) उप परिवहन व्यवस्थापक अभिषेक पराडकर

२.कामोठे पनवेल परीमंडळ (२) उप आयुक्त रविकिरण घोडके

**आपत्कालीन दूरध्वनी क्रमांक**

अ) ०२२२७४६१५००

आ) ०२२६९३६५८०२

इ) ०२२६९३६५६७०

# नवी मुंबईत गटारे, नाले स्वच्छतेवर भर द्या

## पालिका आयुक्तांचे अधिकारी, कर्मचाऱ्यांना निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

२५ मे रोजीच्या रात्रीपासून २६ मे रोजीही मुसळधार अतिवृष्टीमुळे व त्यातही ५.१७ मी. इतक्या मोठ्या उधाण भरतीच्या काळात पावसाचा जोर वाढल्याने प्रामुख्याने सीबीडी बेलापूर विभागात सेक्टर ४, ५, ६, ११ या सेक्टरमध्ये बराच काळ पाणी साचून राहिले. याबाबत महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी अधिकाऱ्यांसह स्वत: क्षेत्रात उपस्थित राहून मदत व बचाव कार्याला गती दिली व दुसऱ्या दिवशी पाणी ओसरल्यानंतर रस्ते, गटारे, नाले स्वच्छतेवर भर दिला व जनजीवन सुरळीत होण्याला प्रथम प्राधान्य दिले.



या बैठकीत प्रत्येक आठही विभागातील स्थितीचा बारकाईने आढावा घेताना या अतिवृष्टीच्या काळात नागरिकांना जाणवलेल्या अडचणी समजून घ्याव्यात व त्याचे निराकरण करण्याच्या दृष्टीने तत्पर कार्यवाही करावी असे निर्देश त्यांनी दिले. याकामी हलगर्जी केलेली आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले व या बाबीकडे गांभीर्याने लक्ष देण्याचे निर्देशित केले.

कामे करताना गटारे, नाले यामधून काढलेला गाळ उचलण्यासाठी तो सुकण्याची वाट न पाहता त्वरित उचलून घेतला जावा. झाडांची छाटणी केल्यानंतर तो हरित कचरा त्वरित उचलून नेण्याची कार्यवाही करण्याचे उद्यान व घनकचरा व्यवस्थापन विभागाने समन्वय राखून नियोजन करावे असे स्पष्ट निर्देश आयुक्तांनी दिले. अशाच प्रकारे पावसाळ्यात वादळी वा-यामुळे झाडे व झाडांच्या फांद्या पडल्यानंतर त्यादेखील त्वरित उचलून रस्ते, पदपथ मोकळे करण्याबाबत कार्यवाहीचे निर्देश आयुक्तांनी दिले.

सुरू असलेली कामे सद्यस्थितीत बंद करून त्याठिकाणी कामाचा फलक असलाच पाहीजे याची दक्षता घ्यावी व सुरक्षेच्या दृष्टीने त्याठिकाणी स्टिलचे बॅरेकेटींग करण्यात यावे असे निर्देश देतानाच कामे करण्यासाठी खोदलेले खड्डे बुजवून त्याचे पुनर्पृष्ठीकरण करणेची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्यात यावी असेही निर्देशित करण्यात आले.

पावसाळी कालावधीत स्वच्छतेकडे अधिक बारकाईने लक्ष देण्याची गरज असून सर्व स्वच्छताकर्मींना कंत्राटदारामार्फत रेनकोट, गमबूट अशी पावसाळी साधने वितरित झाली आहेत व त्याचा वापर ते करीत असल्याबाबत खातरजमा करून घ्यावी अशा सूचना देण्यात आल्या. गावठाण व एलआयजी भागातील अंतर्गत स्वच्छतेकडेही लक्ष देण्याचे निर्देशित करण्यात आले.

पावसाळी कालावधीत स्वच्छता आणि आरोग्य या परस्परपूरक गोष्टींकडे प्राधान्याने लक्ष देत जलजन्य व साथीच्या आजारांप्रमाणेच कोव्हीडचाही प्रभाव वाढत असल्याचे लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना युध्द पातळीवर राबविण्यात याव्यात तसेच पुरेसा औषधसाठा उपलब्ध करून ठेवण्यात यावा असे निर्देशित करण्यात आले. त्यासोबतच नागरिकांनी काय काळजी घ्यावी याबाबत व्यापक जनजागृती करण्याच्याही सूचना देण्यात आल्या.

नागरिकांमार्फत प्राप्त होणाऱ्या तक्रारींचे तत्पर निवारण हे आपले प्रथम कर्तव्य असून त्यादृष्टीने प्रत्येकाने दक्षतेने कार्यवाही करावी व नागरिकांना आश्वस्त करावे असे सर्व अधिकाऱ्यांना निर्देशित करतानाच आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी कोणत्याही प्रकारच्या मदतीसाठी नागरिकांनी नवी मुंबई महानगरपालिका मध्यवर्ती आपत्ती नियंत्रण कक्ष येथे ०२२-२७५६७०६० / ०२२-२२७५६७०६१ या दूरध्वनी क्रमांकावर तसेच १८००२२२३०९ / १८००२२२३१० या टोल फ्री क्रमांकावर अथवा संबंधित विभाग कार्यालयाशी संपर्क साधावा असे आवाहन केले आहे.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त रक्तदान शिबिर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त केदार भगत मित्र परिवाराकडून रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार, १ जून रोजी लोकनेते दि.बा.पाटील विद्यालयात हे शिबिर आयोजित करण्यात आले आहे.

या शिबिराला लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्यासह पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, उरणचे आमदार महेश बालदी, जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, उद्योजक राजू गुप्ते, मंगेश परुळेकर आदी उपस्थित राहणार आहेत.

या वेळी दि न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनीचा ०१ लाखापर्यंतचा अपघाती विमा मोफत काढून दिला जाणार असल्याचे आयोजक भाजप पनवेल शहर उपाध्यक्ष केदार भगत यांनी सांगितले.

# जे.एम. म्हात्रे चॅरिटेबल संस्थेकडून नुकसानग्रस्तांसाठी मदतीचा हात

**उरण : बातमीदार**



मुसळधार वाऱ्यासह झालेल्या अतिवृष्टीमुळे उरण मधील सारडे गावात काही घरांची वाताहात झाली. समाजाचे काही देणं लागतो या भावनेतून प्रितम जनार्दन म्हात्रे यांच्या जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे यांच्या मार्गदर्शनाखाली एक माणुसकीचा हात म्हणून नगरसेवक गणेश कडू, माजी सरपंच जितेंद्र म्हात्रे, रामेश्वर आंग्रे, मंगेश अपराज यांनी दुर्घटनाग्रस्त भागातील घरांची पाहणी केली.

दुर्घटनाग्रस्त रहिवासीयांची भेट घेऊन शासनाकडून योग्य तो मोबदला मिळवून देण्यासाठी नक्कीच प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. सामाजिक बांधिलकीतून जे.एम.म्हात्रे चॅरिटेबल संस्थेच्या माध्यमातून तातडीचे अर्थसहाय्य देऊन त्यांना मदत केली. या वेळी सारडे गावातील शेखर पाटील यांच्यासोबत ग्रामस्थ उपस्थित होते.

# पावसामुळे धरणात गाळ जमा

## पाणी उकळून प्या; श्रीवर्धन नगर परिषदेचे आवाहन

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाझर धरणामध्ये मुसळधार अवकाळी पावसामुळे मोठ्या प्रमाणात गाळ साचल्याने पुढील काही दिवस नागरिकांना गढूळ पाण्याचा सामना करावा लागू शकतो. त्यामुळे नागरिकांनी खबरदारीचा उपाय म्हणून पाणी उकळून व गाळूनच पिण्यास वापरण्याचे आवाहन श्रीवर्धन नगरपरिषदेचे मुख्याधिकारी विराज लबडे यांनी केले आहे.

श्रीवर्धन शहरास रानवली येथील लघुपाटबंधारे विभाग, कोलाड यांच्या अखत्यारीतील पाझर धरणातून पाणीपुरवठा केला जातो. या धरणालगतच



श्रीवर्धन नगरपरिषदेमार्फत आधुनिक जलशुद्धीकरण प्रकल्प उभारण्यात आलेला असून, याच प्रकल्पाच्या माध्यमातून शहरातील नागरिकांना स्वच्छ व शुद्ध पाणी पुरवले जाते.

मागील काही दिवसांपासून परिसरात झालेल्या अवकाळी पावसामुळे धरणाच्या परिसरातील लाल मातीचे डोंगर ढासळले आहेत. त्यामुळे मोठ्या प्रमाणात गाळ वाहून जलशुद्धीकरण प्रकल्पातील जॅकवेलमध्ये साचला आहे. यामुळे पाणी शुद्ध करण्याच्या प्रक्रियेत अडथळा निर्माण झाला आहे.

नगर परिषद सतत स्वच्छतेची कामे हाती घेत असून, जलप्रक्रिया केंद्रात ॲलम, क्लोरीन यांसारख्या शुद्धीकरण औषधांच्या मात्राही वाढवण्यात आलेल्या आहेत. तरीही नैसर्गिक घडामोडीमुळे काही अंशी गढूळ पाण्याचा पुरवठा होण्याची शक्यता कायम आहे.

मुख्याधिकारी विराज लबडे यांनी सांगितले, नागरिकांच्या आरोग्यासाठी कोणतीही तडजोड न करता आम्ही जलप्रकल्पाची नियमित स्वच्छता आणि शुद्धीकरण प्रक्रिया राबवत आहोत. मात्र, खबरदारी म्हणून नागरिकांनी पुढील काही दिवस पाणी उकळूनच पिणे आवश्यक आहे. घरगुती पाण्याचा साठा उकळून व गाळून वापरावा. शक्य असल्यास फिल्टर वापरावा. बालक, गर्भवती महिला व ज्येष्ठ नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी

श्रीवर्धन नगर परिषद जलप्रकल्पाचे सखोल परीक्षण करत असून, गाळ हटवण्याचे काम युद्धपातळीवर सुरू आहे. पावसाचे प्रमाण कमी होताच स्थिती पूर्ववत करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. श्रीवर्धन नगर परिषद ISO 9001:2015 प्रमाणित असून, पाणीपुरवठा व्यवस्था नियमितपणे देखरेखीखाली आहे. तरीही नागरिकांनी आपल्या आरोग्यासाठी आवश्यक ती खबरदारी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

## कत्तलीसाठी नेणाऱ्या म्हशींची वाहतूक पकडली

**चौक : प्रतिनिधी**

कोल्हापूर येथून चार टेम्पो मधून ८० म्हशी मुंबई येथे कत्तली साठी घेऊन जात असल्याची खबर खालापूर पोलिसांना मिळाली, पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी तत्काळ खालापूर टोल नाक्यावर हे चार टेम्पो पकडले.



ईदसण जवळ आला असून ईद साजरी करण्यासाठी जातीय सलोखा व पोषक वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू असताना मुंबई देवनार येथे कत्तलीसाठी कोल्हापूर जिल्ह्यातील हातकणांगले येथील वडगाव बाजारातून चार टेम्पो मधून ८० म्हशी जात असल्याची पक्की खबर पोलिसांना मिळाली, पोलीस निरीक्षक सचिन पवार यांनी तात्काळ खालापूर टोल नाक्यावर बंदोबस्त तैनात केला असता चार टेम्पोत ८० म्हशी आढळल्या.

चारही टेम्पोचा आरटीओ व पशुवैद्यकीय अधिकारी यांचेकडील कोणताही वाहतुक परवाना नाही. प्रत्येक टेम्पोमध्ये २० म्हशी याप्रमाणे भरून या म्हशींना हवा, पाणी, चारा यांची कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही. अत्यंत दाटीवाटीने म्हशी भरल्याचे दिसून येत होते. त्यामुळे करीम कलीम कुरेशी (वय २८, रा. गोवंडी, शिवाजीनगर, लोटस कॉलनी मुंबई), हिदायत शहदाय अब्बास सय्यद (वय ४८, रा. गोवंडी मुंबई), फरान आस्लम आलवी (वय ३०, रा.गोवंडी, शिवाजीनगर लोटस कॉलनी मुंबई), रेहान आस्लम आलवी (वय २४, रा. गोवंडी मुंबई), प्रताप भिका चव्हाण (वय ६० वर्षे, रा. गोवंडी टाटानगर), बबन बाळाराम कांबळे (वय ६०, रा. सावरडे, ता. हातकणंगले, जि. कोल्हापुर), रमजान छेटू खान, (वय ५१, रा. टाटानगर गोवंडी मुंबई) यांच्या विरुद्ध कायदेशीर फिर्याद खालापूर पोलीस ठाण्यात दाखल केली आहे.

## मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त आरोग्य शिबिर





**कर्जत : रामप्रहर वृत्त**

जागतिक मासिक पाळी स्वच्छता दिनानिमित्त २८ मे २०२५ रोजी रायगड मेडिकल असोसिएशन, लार्सन अँड टुब्रो फाउंडेशन, कोतवाल वाडी ट्रस्ट व सद्भाव फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आरोग्य तपासणी व जनजागृती शिबिराचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमाला डॉ. आशुतोष कुळकर्णी (अध्यक्ष, आरएमए), डॉ. प्रशांत गांगल (सचिव), डॉ. कुमार ओसवाल (कोषाध्यक्ष), डॉ. दिलीप सावळे (संपादक), डॉ. संजय भामेरे (वरिष्ठ फिजिशियन, एल अँड टी), तसेच डॉ. शर्वाणी कुळकर्णी (स्त्रीरोगतज्ज्ञ, कर्जत) यांची प्रमुख उपस्थिती होती.

डॉ. शर्वाणी कुळकर्णी यांनी उपस्थित महिलांना मासिक पाळीविषयीच्या गैरसमजुती, स्वच्छतेचे महत्त्व आणि पर्यावरणपूरक सॅनिटरी नॅपकिन्सच्या विल्हेवाटीकरणाविषयी मार्गदर्शन केले. या शिबिरात १०० पेक्षा अधिक महिलांनी सहभाग घेतला. त्यांना हीमोग्लोबिन आणि साखरेची तपासणी , तसेच सॅनिटरी नॅपकिन्स आणि औषधांचे मोफत वाटप करण्यात आले. श्रीमती लाड (सद्भाव फाउंडेशन) व श्रीमती सुमिता अडे (एल अँड टी मॅट्रन) आणि त्यांच्या कार्यक्षम टीमने शिबिराच्या आयोजनात भूमिका बजावली.

## श्रीवर्धन बसस्थानकातील शौचालय बंद

### प्रवासी, विद्यार्थी व नागरिकांचे हाल

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील मुख्य बसस्थानक असलेल्या श्रीवर्धन आगारात दररोज मोठ्या प्रमाणात प्रवासी, विद्यार्थी आणि सामान्य नागरिकांची वर्दळ असते. तालुक्याचे प्रशासकीय केंद्र, उपजिल्हा रुग्णालय, न्यायालय, शासकीय व निमशासकीय कार्यालये यामुळे नागरिकांचे येणे-जाणे नियमित असते. तसेच शहरातील शाळा व महाविद्यालयांमुळे तालुक्यातील विविध खेड्यांतील विद्यार्थी-विद्यार्थिनींचीही मोठी उपस्थिती असते.



या सर्व प्रवाशांना अत्यावश्यक असलेल्या सुविधांपैकी एक म्हणजे स्वच्छ व कार्यरत शौचालय. दुर्दैवाने, श्रीवर्धन बसस्थानकातील सार्वजनिक शौचालय गेले कित्येक महिने बंद आहे. परिणामी महिलांना, वृद्धांना, लहान मुलांना आणि प्रवासी वर्गाला प्रचंड गैरसोयींना सामोरे जावे लागत आहे.

या समस्येबाबत अनेकदा संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधण्यात आला असून, ठेकेदारांना काम त्वरित सुरु करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या आहेत, मात्र याला सुद्धा महिना उलटून गेल्यावरही शौचालय अद्याप 'जैसे थे' अवस्थेत आहे. यामुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे.

प्रवासी, विद्यार्थी आणि स्थानिक नागरिकांनी याबाबत तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. ही केवळ सोयीची नव्हे तर आरोग्याशी संबंधित अत्यावश्यक बाब असून, त्याकडे वरिष्ठ कार्यालयाने तातडीने गांभीर्याने लक्ष द्यावे, अशी एकमुखी मागणी होत आहे.

श्रीवर्धन सारख्या महत्त्वाच्या बसस्थानकावर शौचालय सुविधा बंद असणे ही केवळ दुर्लक्ष नव्हे, तर प्रवाशांच्या मूलभूत अधिकारांवर गदा आहे. ही सेवा लवकरात लवकर पूर्ववत करावी आणि भविष्यात अशी वेळ पुन्हा येणार नाही याची काळजी घेणे प्रशासनाची जबाबदारी आहे. विषयाच्या गांभीर्याची जाणीव ठेवून त्वरित उपाययोजना करण्यात याव्यात, अन्यथा नागरिकांचा रोष उफाळून येण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

## पाली भाजपतर्फे जनसेवेतील रणरागिणींचा गौरव

**पाली : प्रतिनिधी**

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांचा ३०० वा जन्मशताब्दी महोत्सव भारतीय जनता पक्ष सुधागडच्या वतीने विविध लोकाभिमुख, समाजपयोगी उपक्रमातून गुरुवारी (दि.२९) रोजी पाली गुजराती समाज हॉल येथे मोठ्या उत्साही व आनंददायी वातावरणात पार पडला.

पुण्यश्लोक राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जन्म शताब्दी महोत्सवानिमित्त पाली सुधागड तालुक्यातील जनसेवेतील शेकडो रणरागिनींचा पालीत यथोचित गौरव करण्यात आला. या सन्मानार्थींमध्ये जन सेवाकामी अविरत मेहनत



घेणाऱ्या अंगणवाडी सेविका, अंगणवाडी मदतनीस, आशा वर्कर, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेविका, आरोग्य सहाय्यीका आदींना भेटवस्तू व सन्मान चिन्ह देऊन सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणजन माजी जि. प अध्यक्षा, भाजप नेत्या ॲड. निलिमाताई पाटील, भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई, रायगड जिल्हा उपाध्यक्ष राजेश मपारा, सुधागड तालुका प्रमुख श्रीकांत ठोंबरे, आरिफ मणियार आदींनी पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला.

या वेळी भाजप नेत्या, माजी रायगड जिल्हा परिषद अध्यक्षा ॲड. नीलिमाताई पाटील, भाजप नेते प्रकाशभाऊ देसाई, भाजप महाराष्ट्र प्रदेश सदस्य राजेश मपारा, चंद्रकांत घोसाळकर, सुधागड तालुका अध्यक्ष श्रीकांत ठोंबरे, माजी सभापती उज्वला देसाई, माजी सभापती सौ. डुमना, विठ्ठल सिंदकर, राजेंद्र गांधी, आरिफ मणियार, सरचिटणीस शरद चोरगे, यशवंत पालवे, बळीराम जाधव, रामभाऊ आंग्रे, दीपक पवार,सुशील शिंदे, नरेंद्र खाडे, रोहन दगडे, प्रणाली शेठ, राजेश गोळे, जालिंदर खैरे, शुभदा पाटील, प्रफुलला रायकर, अजय खंडागळे, शिरीष सकपाळ,संजय शिंदे, चंद्रकांत फोंडे आदींसह भाजप पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ओएसिस संस्थेचे स्वातंत्र्यवीरांना अभिवादन

**रेवदंडा : प्रतिनिधी**

ओएसिस संस्थेच्या वतीने स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या १९२ व्या जयंतीनिमित्त मांडला येथे आयोजित अभिवादनपर परिसंवाद कार्यक्रमात प्रमुख वक्ते म्हणून ओएसिस संस्थेचे स्वयंसेवक समन्वयक दर्श नागोटकर होते.

व्यासपीठावर कार्यक्रम अध्यक्ष म्हणून युवा सामाजिक कार्यकर्ते प्रतिक कोळी, संस्थेचे कार्याध्यक्ष यज्ञेश पाटील, सहखजिनदार सार्थक गायकवाड, माजी ग्रामपंचायत सदस्या गीता नागोटकर तथा बोर्ली, कोर्लई, महाळुंगे, काकळघर या परिसरातील स्वयंसेवक उपस्थित होते.



कार्यक्रम अध्यक्षांच्या भूमिकेतून उपस्थित प्रतिक कोळी यांनी पूर्वग्रहदूषित इतिहासाला, फसव्या नरेटीव्हला बळी न पडता देशाच्या स्वातंत्र्य क्रांतीचा इतिहास साधार वाचा, अवलोकन करा आणि मगच सत्य जाणून घ्या, असे आवाहन केले.

कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन तथा प्रतिमा पूजन तसेच स्वा. सावरकर रचित जयोस्तुते या गीत गायनाने करण्यात आली. सुनियोजित आणि शिस्तबद्ध स्वरूपात झालेल्या या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संस्थेचे सहखजिनदार सार्थक गायकवाड, प्रास्ताविक तथा आभार यज्ञेश पाटील यांनी मानले.

## महसूल विभागातील १७७ कर्मचाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यातील महसूल विभागातील वर्ग तीन कर्मचाऱ्यांच्या समुपदेशनाने बदल्या करण्यात आल्या. १७७ कर्मचाऱ्यांच्या बदलीची प्रकिया पूर्ण करण्यात आली.

नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय अलिबा येथे गुरुवारी (दि.२९) ही समुपदेशनाची प्रकिया पूर्ण करण्यात आली. जिल्हाधिकारी किशन जावळे, निवासी उपजिल्हाधिकारी संदेश शिर्के, समुपदेशन समितीचे सदस्य तसेच सर्व विभागप्रमुख या वेळी उपस्थित होते.

ग्राम महसूल अधिकारी (तलाठी), मंडल अधिकारी, सहाय्यक महसूल अधिकारी (अव्वल कारकून), महसूल सहाय्यक ( सहाय्यक लिपिक) या चार वर्गातील एकूण १७७ कर्मचाऱ्यांची बदली करण्यात आली. जे कर्मचारी सहा वर्षे एकच ठिकाणी आहेत किंवा जे पाच वर्षांपेक्षा जास्त वर्ष एकच ठिकाणी आहेत त्यांची दुसऱ्या तालुक्यात बदली करण्यात आली आहे.ज्यांची एकच ठिकाणी तीन वर्ष झाली आहेत त्यांची त्याच तालुक्यात दुसऱ्या सज्ञत बदली करण्यात आली आहे.

समुपदेशनामुळे कर्मचाऱ्यांना ज्येष्ठेनुसार पसंतीची संधी देण्यात आली. नैसर्गिक न्यायानुसार बदली करण्यात आली. कुणाचाही दबाव नाही कुणाची शिफारस नाही. अत्यंत पारदर्शकपणे बदली प्रक्रिया झाली. कुणावरही अन्याय झाला नाही. त्यामुळे कर्मचारी खुश आहेत, असे जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी सांगितले.

## प्रशांत कदम यांचा राज्यपालांच्या हस्ते सन्मान

**चौक : प्रतिनिधी**

तांबटी ग्रुप ग्रामपंचायतीचे ग्राम अधिकारी प्रशांत कदम यांची आदर्श ग्रामपंचायत अधिकारी म्हणून संपूर्ण रायगड जिल्ह्यातून एकमेव निवड झाली असून राज्याचे महामहिम राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांच्या हस्ते आदर्श ग्राम पंचायत अधिकारी म्हणून सन्मान करण्यात आला आहे, त्यामुळे त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे, राज्यमंत्री एकनाथ डवले आणि गृह राज्य मंत्री योगेश कदम यांच्या उपस्थितीत यशवंतराव चव्हाण प्रतिष्ठान मुंबई येथे गौरविण्यात आले. प्रशांत पांडुरंग कदम हे ग्रुप ग्रामपंचायत तांबटी चे ग्राम पंचायत अधिकारी म्हणून कार्यरत आहेत.

संपूर्ण रायगड जिल्ह्यात ग्रुप ग्रामपंचायत तांबटी हे एक मॉडेल होण्याच्या मार्गावर आहे, गटविकास अधिकारी संदीप कराड, ग्राम विस्तार अधिकारी, सरपंच अविनाश आम्ले, सर्व सदस्य, ग्राम पंचायत कर्मचारी, ग्रामस्थ यांचे मार्गदर्शन आणि सहकार्य माझी पत्नीप्रचिती हिने दिलेले प्रोत्साहन यामुळेच आपण या पुरस्काराला गवसणी घातली असून हा पुरस्कार त्यांना समर्पित करीत आहे, असे आदर्श ग्राम पंचायत अधिकारी प्रशांत कदम यांनी प्रतिनिधी यांच्याशी बोलताना भावना व्यक्त केल्या.



## अभिजित पाटील यांची निवड

**अलिबाग : प्रतिनिधी**



आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित सुरेश पाटील यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या पतसंस्था व्यवस्थापन पदविका शिक्षणक्रम तज्ञ सल्लागार समितीमध्ये निवड करण्यात आली आहे.

प्रा. मनीष देशमुख हे या समितीचे अध्यक्ष आहेत. तज्ञ सल्लागार समितीमध्ये आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजित पाटील तसेच उत्तम गाडगे, संदीप कोयटे सदस्य आहेत.

अभिजित पाटील मागील तीन वर्षांपासून आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. दक्षिण कोरियामध्ये झालेल्या आशिया खंडातील सहकारी पतसंस्थांच्या प्रशिक्षण शिबिरासाठी त्यांची निवड झाली होती. महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्थांचा महासंघातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या प्रशिक्षण शिबिरांमध्ये तंत्रज्ञान या विषयावर ते व्याख्यान देण्यासाठी जात असतात.

अभिजित पाटील यांच्या सहकार क्षेत्रातील योगदान व ज्ञानाचा अभ्यासक्रम तयार करतांना उपयोग व्हावा व हा शिक्षणक्रम संपूर्ण महाराष्ट्रातील सहकारात कार्य करू इच्छिणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत पोहचावा, या अनुषंगाने तज्ञ म्हणून त्यांची यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या तज्ञ सल्लागार समितीमध्ये सदस्य म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक सुरेश पाटील तसेच सर्व संचालकांनी अभिजित पाटील यांचे अभिनंदन केले.

## जुळ्या कन्यारत्नांचे अनोखे स्वागत

**चौक : प्रतिनिधी**

जुळ्या कन्या जन्मांचे स्वागत आणि सन्मानाच्या मानकरी वेणगाव, कर्जत येथील निलम प्रवीण सावंत ठरल्या. जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून सहज सेवा फाउंडेशनच्या वतीने खोपोली विभागात जन्मास येणाऱ्या कन्या रत्नास जन्म देणाऱ्या मातेचे अभिनंदन व कौतुक उपक्रमाचे आयोजन ८ मार्च २०२५पासून प्रारंभ करण्यात आला.

खोपोली हद्दीतील दवाखान्यात कन्या रत्नास जन्म देणाऱ्या मातेचा सन्मानपत्र देऊन अभिनंदन करण्याच्या उपक्रमाची सुरुवात



खोपोली येथून करण्यात आली. सुमित्रा राज हॉस्पिटल, खोपोली येथे गुरुवार २९ मे २०२५ रोजी वेणगाव, कर्जत येथील निलम प्रवीण सावंत यांनी जुळ्या कन्यांना जन्म दिलेला आहे. या उपक्रमातील पहिल्या जुळ्या कन्या जन्माचे स्वागत करून मातेस खोपोलीतील सृष्टी सचिन साठे व संस्कृती सचिन साठे या जुळ्या बहिणींनी शुभेच्छा देत प्रमाणपत्र देऊन सन्मानित केले. या वेळी डॉ.संगीता केजरीवाल, प्रवीण सावंत, निलम पाटील, कमल सावंत, अनिता सावंत, पुष्पा आगज, मनोज जांगिड, रेश्मा पारंगे उपस्थित होते.

आंबिवली-माजगाव येथील सहज सेवा फाउंडेशनच्या पदाधिकारी व यशस्वी महिला उद्योजक कमल रमाकांत जाधव व श्री कलेक्शन, खोपोली यांचे विशेष सहकार्य या उपक्रमासाठी लाभत आहे.

# आरसीबीची आयपीएल फायनलमध्ये धडक

**चंदिगड : वृत्तसंस्था**

रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाने उत्कृष्ट सांघिक कामगिरीच्या जोरावर यंदाच्या आयपीएल २०२५च्या अंतिम फेरीत धडक मारली आहे. आरसीबीने पहिल्या क्वालिफायर सामन्यात पंजाब किंग्सला आठ विकेट्सने पराभूत केले. पंजाब किंग्सने दिलेले १०२ धावांचे माफक लक्ष्य आरसीबीने दोन विकेट्स गमावत अवघ्या १० षटकांत गाठले. यासह आरसीबीचा संघ चौथ्यांदा आयपीएलच्या अंतिम फेरीत पोहचला आहे.

पहिल्या क्वालिफायरमध्ये आरसीबीने पंजाबला एकतर्फी सामन्यात पराभूत केला. जोश हेझलवूड, सुयश शर्मा आणि फिल सॉल्ट हे आरसीबीच्या विजयाचे हिरो ठरले. हेझलवूड आणि सुयश यांनी उत्कृष्ट गोलंदाजी केली आणि प्रत्येकी तीन विकेट घेतल्या, तर सॉल्टने जलद अर्धशतक झळकावत संघाला विजयाकडे नेले. आरसीबी २०१६नंतर नऊ वर्षांनी अंतिम फेरीत पोहचले.

पंजाबने दिलेल्या १०२ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना फिल सॉल्ट २७ चेंडूत सहा चौकार आणि तीन षटकारांसह नाबाद ५६ धावांची खेळी केली. विराट कोहली १२ चेंडूत १२ धावा करत बाद झाला. मयंक अग्रवाल १३ चेंडूत दोन चौकार आणि एका षटकारासह १९ धावा करत बाद झाला, तर रजत पाटीदार आठ चेंडूत एक चौकार व एक षटकारासह १५ धावा करत नाबाद परतला.

आरसीबीने नाणेफेक जिंकली आणि प्रथम गोलंदाजीचा निर्णय घेतला होता. पंजाब किंग्सचा संघ प्रथम फलंदाजीला उतरला, मात्र पंजाबचा फलंदाजी क्रम पत्त्यांसारखा कोसळला आणि संघ १४.१ षटकांत सर्वबाद झाला. पंजाब फक्त १०१ धावा करू शकला. पंजाबकडून प्रियांश आर्य ७, प्रभसिमरन सिंग १८ धावा, इंग्लिस ४, श्रेयस अय्यर २, तर नेहल वधेरा ८ धावा करत स्वस्तात बाद झाला. यानंतर स्टॉयनिसने सर्वाधिक २६ धावा बाद झाला, तर अजमतुल्लाने १८ धावा केल्या.



### ऐतिहासिक विजय

आरसीबीने पहिला क्वालिफायर सामना फक्त १० षटकांत जिंकला. चेंडूंच्या बाबतीत प्लेऑफमधील कोणत्याही संघाचा हा सर्वात मोठा विजय आहे. या संघाने ६० चेंडू बाकी ठेवत सामना जिंकला. गेल्या वर्षी केकेआरने चेन्नईला ५७ चेंडू शिल्लक ठेवत हरवले होते. यापूर्वी केकेआरने सनरायझर्स हैदराबादला ३८ चेंडू बाकी असताना हरवले होते.

### विराटने गाठला १३,५०० धावांचा पल्ला

आयपीएलच्या १८व्या हंगामात किंग कोहलीच्या आरसीबीने दिमाखदार विजय नोंदवत चौथ्यांदा फायनल गाठली आहे. पंजाबच्या संघाने दिलेल्या अल्प धावसंख्येचा पाठलाग करताना विराट कोहली अवघ्या १२ धावांवर बाद झाला. पण या छोट्याखानी खेळीसह त्याने मोठा विक्रम आपल्या नावे केला आहे. टी-२० क्रिकेमध्ये विराटने १३,५०० धावांचा पल्ला पार केला आहे. क्रिकेटच्या छोट्या प्रारूपात हा टप्पा गाठणारा तो पहिला भारतीय क्रिकेटर ठरलाय. विराट हा टी-२० क्रिकेटमध्ये भारताकडून सर्वाधिक धावा करणारा फलंदाज आहे. यंदाच्या आयपीएल हंगामात १४ सामन्यात त्याने आठ अर्धशकासह ६१४ धावा केल्या आहेत.

# थाई बॉक्सिंगमध्ये कर्जतच्या वैदेही जाधवला रौप्यपदक

**कर्जत : प्रतिनिधी**

बँकॉक (थायलंड) येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय थाई बॉक्सिंग स्पर्धेत महाराष्ट्रातील सहा खेळाडू विजेते ठरले आहेत. यामध्ये कर्जत तालुक्यातील नेरळमधील १२ वर्षीय वैदेही जाधव हिने ३६ किलो वजनी गटात भारताला रौप्यपदक जिंकून दिले.

या स्पर्धेत जपान भारत, चीन, ऑस्ट्रेलिया, रशियासह २५ देशातील खेळाडूंचा समावेश झाला होता. स्पर्धेचे उद्घाटन थायलंडच्या राष्ट्रपती पेटोंग टॉर्न सिंन्हामात्र यांच्या हस्ते झाले. स्पर्धेत महाराष्ट्रातील सहा खेळाडू विजेते ठरले, ज्यात वैदेही जाधवचा समावेश आहे.

रौप्यपदक विजेती वैदेही मूळची सावंतवाडीची असून सध्या नेरळ येथे राहत आहे. ती माथेरान व्हॅली स्कूलमध्ये शिकते. तिला इंडिया थाय बॉक्सिंग असोसिएशनचे अध्यक्ष पाशा अत्तर यांचे मोलाचे सहकार्य लाभले तसेच प्रशिक्षक स्वप्नील आडूरकर, करण बाबरे, शिक्षकांचे मार्गदर्शन मिळाले. यशाबद्दल मुख्याध्यापिका मृदुला पटेल यांच्याकडून वैदेहीचे कौतुक करण्यात आले. भारत एज्युकेशन सोसायटीकडूनही अभिनंदन करून शुभेच्छा देण्यात आल्या.



**उलवे नोड : शिवाजीनगर क्रिकेट अकॅडमीत सराव करणारी न्हावाखाडी येथील खेळाडू जिज्ञासा कडू हिची महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या स्पर्धेसाठी रायगड क्रिकेट असोसिएशनच्या संघात यष्टीरक्षक म्हणून निवड झाली आहे. याबद्दल माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी जिज्ञासा आणि तिला मार्गदर्शन करणारे प्रशिक्षक मनोज लोखंडे यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. या वेळी ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, ग्रामपंचायत सदस्य सागर ठाकूर, म्हसेश्वर मंदिर कमिटीचे अध्यक्ष सी.एल. ठाकूर आदी उपस्थित होते.**



## करूण नायरचे इंग्लंडमध्ये अर्धशतक

**लंडन : वृत्तसंस्था**

आठ वर्षांच्या प्रदीर्घ प्रतीक्षेनंतर करूण नायरचे टीम इंडियामध्ये पुनरागमन झाले असून त्याने इंग्लंडच्या धरतीवर पहिली परीक्षा उत्तीर्ण केली आहे. इंग्लंड दौऱ्यावर इंडिया अ आणि वरिष्ठ संघात निवड झालेल्या करूणने इंग्लंड लायन्सविरुद्धच्या पहिल्याच सामन्यात अर्धशतक झळकावून लक्ष वेधले.

या सामन्यात टीम इंडियाने कर्णधार इश्वरनची पहिली विकेट गमावली. त्यानंतर करूण मैदानात उतरला. त्याने यशस्वी जैस्वालच्या साथीने संघाचे अर्धशतक धावफलकावर झळकावले. ५१ धावांवर जैस्वाल बाद झाला. अशा प्रकारे टीम इंडियाने दोन विकेट लवकर गमावल्या. त्यानंतर करूणने डाव हाताळला आणि नंतर त्याचे फटके खेळले. त्याने ८५ चेंडूत आपले अर्धशतक पूर्ण केले, ज्यामध्ये नऊ चौकारांचा समावेश होता.

## भारत-ऑस्ट्रेलिया महिलांमध्ये वनडे मालिका

**नवी दिल्ली** : महिला एकदिवसीय विश्वचषक सप्टेंबर २०२५च्या अखेरीस भारतात खेळला जाणार आहे. या स्पर्धेच्या तयारीसाठी टीम इंडिया सप्टेंबरच्या सुरुवातीला घरच्या मैदानावर ऑस्ट्रेलियन संघाचा सामना करेल, ज्यामध्ये त्यांना तीन सामन्यांची वनडे मालिका खेळायची आहे. टीम इंडिया १४ सप्टेंबरपासून ऑस्ट्रेलियाविरुद्ध तीन सामन्यांची वनडे मालिका खेळणार आहे. या मालिकेतील दुसरा सामना १७ सप्टेंबर रोजी खेळला जाईल, तर शेवटचा सामना २० सप्टेंबर रोजी होईल. तिन्ही सामने चेन्नईतील एमए चिदंबरम स्टेडियमवर डे-नाईट खेळवले जातील.















दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com